# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १६५) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शनिवार, दि.२७ जून २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## पान टपरीत एमडी ड्रग्ज, दोघांना अटक

चंद्रपूर दि.२६ (प्रतिनिधी)- राज्यातील अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती झाल्यानंतर राज्यभरात भेसळ, आणि गुटखा, तंबाखूजन्य पदार्थांच्या कारवाईला वेग आला असून कोट्यवधि रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या कारवाईच्या भीतीने राज्यातील अनेक जिल्ह्यात पान पट्टीवरुन गुटखा गायब झाल्याचं दिसून आलं. तर, काही दिवसांपूर्वी एफडीएच्या अधिकाऱ्यांच्या धसका घेत पानटपऱ्याही बंद करण्यात आल्याचं दिसून आलं होतं. मात्र, चंद्रपूरमध्ये चक्क पान सेंटरच्या दुकानातून १०४ ग्रॅम एमडी ड्रग्स पदार्थ जप्त करण्यात आला आहे. या एमडी साठ्याची बाजार भावातील किंमत ५ लाख रुपये असल्याची माहिती आहे. चंद्रपूर शहरातील जटपुरा गेट परिसरातील प्रसिद्ध इटनकर पान सेंटरवर पोलिसांनी घातलेल्या धाडीत ५ लाख रुपये किमतीचा १०४ ग्रॅम एमडी साठा जप्त करण्यात आला आहे. चंद्रपूर पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे जटपुरा गेट जवळच्या इटनकर पान सेंटर वर सापळा रचून पोलिसांनी आरोपी ओम संतोष इटनकर (२५) याला ताब्यात घेतले. आरोपीची तसेच त्याच्या राहत्या घराची झडती घेतली असता त्याच्या ताब्यातून १०४ ग्रॅम एम.डी. म्हणजेच मेफेड्रोन ड्रग्ज जप्त करण्यात आले. चंद्रपूर शहरात पान शौकिनांचे आवडीचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या इटनकर पान सेंटर मध्ये मोठ्या प्रमाणात ड्रग जप्त करण्यात आल्याने एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी दोन आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशन रामनगर येथे गुन्हा नोंद करण्यात आल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखा पोलिस निरीक्षक अमोल काचोरे यांनी दिली.

# एसआयटी तपासानंतर राम मंदिर ट्रस्टमधील कोट्यावधीचा देणगी घोटाळा उघड

## ट्रस्टमधून चंपत राय आणि अनिल मिश्रांचा राजीनामा; एफआयआर दाखल

मुंबई दि.२६ (प्रतिनिधी)- राम मंदिर दान प्रकरणात एक मोठे वळण आले आहे. राम जन्मभूमी ट्रस्टचे सदस्य, चंपत राय आणि अनिल मिश्रा यांनी राजीनामा दिला आहे. घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या एसआयटीच्या प्राथमिक अहवालातील कडक शिफारशींनंतर हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. एसआयटीच्या शिफारशींच्या आधारे या प्रकरणात पहिला एफआयआर आधीच दाखल करण्यात आला आहे. हे राजीनामे तपासाच्या कारवाईशी जोडले जात आहेत. एसआयटी सध्या राम मंदिरातील घोटाळ्याची चौकशी करत आहे. तपास यंत्रणा आरोपींची बँक खाती, मालमत्ता, मोबाईल रेकॉर्ड आणि कथित व्यवहारांची तपासणी करत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एसआयटीच्या प्राथमिक अहवालात काही ठोस शिफारसी करण्यात आल्या आहेत, ज्यामुळे तपासाला आणखी गती मिळाली आहे.

रामललाच्या चरणी भाविकांनी अर्पण केलेल्या कोट्यवधी रुपयांच्या देणगीच्या हाताळणीत आणि देखरेखीत मोठ्या प्रमाणावर निष्काळजीपणा झाल्याचे 'एसआयटी'च्या प्राथमिक चौकशीत उघड झाले होते. हा अहवाल समोर येताच मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या प्रकरणात कोणतीही तडजोड न करण्याची भूमिका घेतली. मुख्यमंत्र्यांच्या या कडक पवित्र्यानंतरच चंपत राय आणि अनिल मिश्रा यांना आपले पद सोडावे लागल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

या संदर्भात, चंपत राय आणि अनिल मिश्रा यांचे राजीनामे देखील या तपासाशी जोडले जात आहेत. सध्या, या संपूर्ण प्रकरणात अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत. एसआयटीच्या अंतिम अहवालात आणखी महत्त्वपूर्ण खुलासे होतील का? तपासाची व्याप्ती वाढेल का? आणि ट्रस्टच्या कामकाजात काही बदल होतील का? या सर्व प्रश्नांची उत्तरे येत्या काही दिवसांत तपास पुढे सरकल्यावर मिळतील.

श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे विश्वस्त कृष्ण मोहन यांच्या तक्रारीवरून राम जन्मभूमी पोलीस ठाण्यात आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एफआयआरमध्ये राम शंकर यादव उर्फ टिनू, अनुकल्प मिश्रा, लवकुश मिश्रा, करुणेश पांडे, अविनाश शुक्ला, मनीष यादव, राम शंकर मिश्रा आणि सुभाष चंद्र श्रीवास्तव यांची नावे आहेत. त्यांच्याविरुद्ध अपहार, फसवणूक आणि गुन्हेगारी कट रचण्याशी संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सूत्रांनुसार, एसआयटीचा प्राथमिक अहवाल अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) यांना सादर केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी आतापर्यंत आठ आरोपींना अटक केल्याचे वृत्त आहे.

या संपूर्ण प्रकरणातील तक्रार कृष्ण मोहन यांनी दाखल केली आहे, ज्यांची सप्टेंबर २०२५ मध्ये श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे सदस्य म्हणून नियुक्ती झाली होती. फेब्रुवारी २०२५ मध्ये विश्वस्त कामेश्वर चौपाल यांच्या निधनानंतर, त्यांची जागा घेण्यासाठी कृष्ण मोहन यांची निवड करण्यात आली. हरदोईचे रहिवासी असलेल्या कृष्ण मोहन यांनी १९७० च्या दशकात लखनौ विद्यापीठातून एमएससी पदवी मिळवली. त्यानंतर त्यांनी सुमारे सहा वर्षे अणुऊर्जा क्षेत्रात काम केले आणि नंतर त्यांची भारतीय वन सेवेसाठी निवड झाली व त्यांनी महाराष्ट्र केडरमध्ये सेवा बजावली. २०१२ मध्ये सेवानिवृत्त झाल्यानंतर ते समाजकार्यात सक्रिय राहिले.

### मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा विरोधकांवर हल्लाबोल

अयोध्या राम मंदिर देणगी गैरव्यवहार प्रकरणावरून उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी विरोधकांवर जोरदार निशाणा साधला आहे. "अयोध्येवर वाईट नजर टाकू नका आणि रामभक्तांची परीक्षा घेऊ नका. जर तुमच्याकडे काही पुरावे असतील, तर ते थेट विशेष तपास पथकासमोर सादर करा," असे आव्हान त्यांनी विरोधकांना दिले आहे. देवरिया येथील एका जाहीर सभेत ते बोलत होते. राम मंदिराला मिळणाऱ्या देणग्यांमध्ये घोटाळा झाल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात होता. या वादावर बोलताना मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले की, या प्रकरणाचा तपास करणाऱ्या एसआयटीचा अहवाल येताच सरकारने तातडीने पावले उचलली आहेत. या गैरव्यवहाराला जबाबदार असणाऱ्यांना अटक करण्यात आली असून, कोणालाही जनतेच्या श्रद्धेचा गैरवापर करू दिला जाणार नाही. "आम्ही दुधाचे दूध आणि पाण्याचे पाणी करू," असे आश्वासन त्यांनी रामभक्तांना दिले.

## व्हेनेझुएला भूकंपात आतापर्यंत ५८९ जण ठार

कराकस दि.२६ (वृत्तसंस्था)- दक्षिण अमेरिकेतील व्हेनेझुएला या देशात झालेल्या दोन भूकंपांमध्ये आतापर्यंत ५८९ लोकांचा मृत्यू झाल्याची आणि २,९८० जण जखमी झाल्याची पुष्टी झाली आहे. बुधवार, २५ जून रोजी, व्हेनेझुएलामध्ये १८२१ च्या काराबोबो युद्धाच्या स्मरणार्थ राष्ट्रीय सुट्टी होती. त्यामुळे, बहुतेक लोक घरात बसून फिफा विश्वचषक सामने पाहत होते. परिणामी, ढिगाऱ्याखाली गाडल्या गेलेल्या लोकांची संख्या अधिक असण्याची शक्यता आहे. स्थानिक माध्यमांच्या वृत्तानुसार, ढिगाऱ्याखालून आवाज ऐकू येत आहेत. सरकारने काल रात्री उशिरा जाहीर केले की, ३९,००० हून अधिक लोक बेपत्ता आहेत. भूकंपाच्या तीव्रतेचे खरे स्वरूप अद्याप स्पष्ट झालेले नाही. यूएस जिओलॉजिकल सर्व्हेनुसार, भूकंपात १०,००० हून अधिक लोकांचा मृत्यू होण्याची ४४टक्के शक्यता आहे. १,००,००० लोकांचा मृत्यू होण्याची ३०टक्के शक्यता आहे. या आपत्तीमुळे व्हेनेझुएलाच्या अर्थव्यवस्थेला ९.५ ट्रिलियन रुपयांचे नुकसान होऊ शकते. कार्यवाहक राष्ट्रपती डेल्सी रॉड्रिग्ज यांनी आणीबाणी जाहीर केली आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाचा लवकरच विस्तार; ऑपरेशन टायगरमुळे शिंदेंची ताकद वाढली

## श्रीकांत शिंदेंना कॅबिनेट, तर राष्ट्रवादीलाही मंत्रिपदाची चर्चा

मुंबई दि.२६ (प्रतिनिधी)- ऑपरेशन टायगर यशस्वी करत उद्धव ठाकरे गटाच्या ६ खासदारांना आपल्या गोटात खेचणाऱ्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची दिल्ली दरबारात ताकद चांगलीच वाढली आहे. लोकसभेतील वाढलेले संख्याबळ लक्षात घेता येत्या २८ किंवा २९ जून रोजी होणाऱ्या संभाव्य केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारात शिवसेनेला अतिरिक्त मंत्रिपदे मिळण्याची दाट शक्यता आहे. यात खासदार श्रीकांत शिंदे यांचे नाव कॅबिनेट मंत्रिपदासाठी आघाडीवर असून, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसलाही या फेरबदलात कॅबिनेटमध्ये सामावून घेतले जाणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळ विस्ताराबाबत अधिकृत घोषणा झालेली नसली, तरी दिल्लीतील राजकीय हालचालींना वेग आला आहे.

सध्या केंद्रात शिवसेनेचा एकच मंत्री (प्रतापराव जाधव) आहे. मात्र, ऑपरेशन टायगरनंतर वाढलेल्या बळामुळे शिवसेनेला आता एक कॅबिनेट आणि दोन राज्यमंत्री अशी एकूण तीन मंत्रिपदे मिळण्याची चर्चा सुरू आहे. २०२४ मध्ये एनडीए सरकार स्थापन होताना शिवसेनेला कॅबिनेट मंत्रिपदाची ऑफर होती, मात्र डॉ. श्रीकांत शिंदे यांनी ती नाकारली होती. आता बदललेल्या परिस्थितीत पक्षातील वरिष्ठ नेत्यांच्या आग्रहाखातर ते हे पद स्वीकारतील, अशी दाट चर्चा आहे. विद्यमान केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव यांच्याकडील आरोग्य राज्यमंत्रिपद काढून घेऊन ते शिवसेनेच्याच नव्या खासदाराला दिले जाऊ शकते. मात्र, त्यांचा आयुष मंत्रालयाचा स्वतंत्र प्रभार कायम राहील, असेही सूत्रांकडून समजते. दरम्यान, राज्यमंत्रिपदासाठी धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांचे नाव चर्चेत आहे.

उबाठा गटातून नुकतेच शिवसेनेत दाखल झालेले ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांचेही नाव मंत्रिपदाच्या शर्यतीत होते. मात्र, मुंबईत पत्रकारांना केलेली जाहीर अश्लील शिवीगाळ आणि बॉम्ब टाकून मारण्याच्या धमकीमुळे त्यांची प्रतिमा मलिन झाली आहे. हायकमांड त्यांच्या या मुजोर वर्तनामुळे प्रचंड नाराज असून, त्यामुळे त्यांची मंत्रिपदाची संधी हुकल्याचे बोलले जात आहे.

## सोने-चांदीच्या दरात सर्वात मोठी घसरण; सात महिन्यांतील नीचांकी पातळीवर भाव

मुंबई दि.२६ (प्रतिनिधी)- आज (शुक्रवार, २६ जून रोजी) सराफा बाजारात सोने आणि चांदीच्या किमतीत पुन्हा एकदा घसरण पाहायला मिळत आहे. जागतिक बाजारपेठेतील मोठ्या प्रमाणावरील विक्री आणि व्याजदरांबाबत अमेरिकन फेडरल रिझर्व्हने घेतलेली कडक भूमिका यामुळे गेल्या २-३ दिवसांपासून बाजार दबावाखाली आहे. याचा थेट परिणाम मौल्यवान धातूंच्या दरांवर झाला असून किमती सातत्याने खाली येत आहेत.

आज २४ कॅरेट सोन्याचा भाव कालच्या (२५ जून) तुलनेत प्रति १० ग्रॅम ९४० रुपयांनी घसरला आहे. काल याची किंमत १,४१,०७० रुपये होती, ती आज घटून १,४०,१३० रुपयांवर आली आहे. याचप्रमाणे २२ कॅरेट सोन्याच्या दरात प्रति १० ग्रॅम ८६० रुपयांची घसरण झाली आहे. काल १,२९,२२० रुपयांवर असलेले सोन्याचे भाव आज १,२८,३६० रुपयांवर आले आहेत.

चांदीच्या किमतीत काल (२५ जून) प्रति किलो तब्बल १०,००० रुपयांची मोठी घसरण झाली होती. त्या तुलनेत आज चांदीच्या भावात प्रति किलो १०० रुपयांची किरकोळ घसरण दिसत आहे. काल चांदीचा दर प्रति किलो २,३५,००० रुपये होता, तो आज २,३४,९०० रुपये प्रति किलो एवढा आहे.

## केतन अग्रवाल हत्या प्रकरणासाठी अ‍ॅड. उज्ज्वल निकम यांची नियुक्ती!

पुणे दि.२६ (प्रतिनिधी)- लोहगड किल्ल्यावरून ढकलून करण्यात आलेली केतन अग्रवालची हत्या खरोखरच अनाकलनीय आणि धक्कादायक आहे. समाज म्हणून आपण याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे," अशी तीव्र प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. चांगल्या घरच्या आणि सुशिक्षित मुलांमध्ये अशी सूडबुद्धी आणि गुन्हेगारी प्रवृत्ती का निर्माण होते, याचा केवळ कायदेशीरच नाही तर सामाजिक अँगलनेही तपास झाला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

पुण्यातील प्रख्यात बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल यांचा मुलगा केतनचा त्याची भावी पत्नी सिया गोयलने प्रियकर चेतन चौधरीच्या मदतीने लोहगड किल्ल्यावरून ४०० फूट खोल दरीत ढकलून खून केल्याचे पोलिस तपासात दिसून आले. या दोघांना न्यायालयाने २९ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

दरम्यान लोहगड येथे घडलेल्या केतन अग्रवाल यांच्या दुर्दैवी हत्या प्रकरणी, त्यांचे वडील विशाल अग्रवाल यांनी आज पुण्यात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत आपल्या मुलाला न्याय मिळवून देण्याची मागणी केली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी अग्रवाल कुटुंबीयांचे सांत्वन करत, त्यांना न्याय देण्यासाठी सरकारकडून कोणतीही कसूर सोडली (पान ४ वर)

### नसरापूर खटल्याच्या वेगवान निकालाचे कौतुक

पुण्याच्याच नसरापूर येथील साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून तिची हत्या करणाऱ्या ६५ वर्षीय भिमराव कांबळे या नराधमावरही मुख्यमंत्र्यांनी कडक शब्दांत भाष्य केले. विशेष न्यायालयाने या नराधमाला आधीच दोषी ठरवले असून, २९ जून रोजी त्याची शिक्षा सुनावली जाणार आहे. "हे अत्यंत दुर्मिळ आणि क्रूर प्रकरण असून, आम्ही न्यायालयाने या हैवानाला थेट मृत्यूदंडाची शिक्षा द्यावी अशी मागणी केली आहे, न्यायालय ती मान्य करेल अशी पूर्ण अपेक्षा आहे," असे मुख्यमंत्री म्हणाले. १ मे २०२६ रोजी नसरापूरमध्ये घडलेल्या या पाशवी घटनेनंतर वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजयमाला पवार यांनी अवघ्या १५ दिवसांत तपास पूर्ण करत १२०० पानांचे आरोपपत्र न्यायालयात दाखल केले होते. विशेष म्हणजे, न्यायालयाने सुट्टीच्या दिवसांतही काम करून केवळ दोन महिन्यांत हा खटला निकाली काढला आहे. राज्यातील हा आतापर्यंतचा सर्वात वेगवान ऐतिहासिक खटला ठरला असून, अशा जलद निकालांमुळे गुन्हेगारांवर कायद्याचा वचक बसेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

## खासदार संजय दिना पाटील यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता

मुंबई दि.२६ (प्रतिनिधी)- पत्रकारांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केल्याप्रकरणी वादाच्या भोवऱ्यात सापडलेले शिवसेना (शिंदे गट) खासदार संजय दिना पाटील यांच्या अडचणीत आता मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. मनसे नेते संदीप देशपांडे यांनी आज एक पत्रकार परिषद घेऊन खासदार संजय दिना पाटील यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. संदीप देशपांडे यांनी थेट एक फोटो प्रसिद्ध करत या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी गृहमंत्री आणि पोलिसांकडे केली आहे.

पत्रकार परिषदेत संशयास्पद फोटो दाखवत संदीप देशपांडे म्हणाले, 'आता मी तुम्हाला एक फोटो दाखवतो. या फोटोतील व्यक्ती कोण आहे? याच्यावर कुठला गुन्हा दाखल आहे? ही व्यक्ती फरार आहे का आणि असेल तर कुठल्या गुन्ह्यामध्ये फरार आहे? नाशिकच्या केबल चोरीशी या व्यक्तीचा काही संबंध आहे का? जवळजवळ दहा कोटी रुपयांची ही चोरी होती. त्यामधील हा फरार आरोपी आहे का? याचे उत्तर पोलिसांनी द्यावे. हे असे लोक खरोखर असतील तर ते खासदारांसोबत काय करत आहेत? काही दिवसांपूर्वी संजय दिना पाटील यांच्या गाडीचा अपघात झाला होता ती गाडी याच व्यक्तीच्या नावावर आहे का? या व्यक्तीचा खासदारासोबत फोटो आहे. माझी माहिती आहे की ही व्यक्ती गुन्हेगारीमध्ये आहे,' असा आरोप त्यांनी केलाय.

## धुळे जिल्ह्यात २ कोटींहून अधिक किमतीचे अंमली पदार्थ नष्ट

धुळे दि.२६ (पतिनिधी)- धुळे जिल्हास्तरीय प्रादेशिक अंमली पदार्थ नाश समितीने आज (दि. २६) विविध गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आलेले सुमारे दोन कोटी रुपयांचे अंमली पदार्थ नष्ट केले. यात ९०१ किलो गांजा, १७३.९० किलो अफूची बोंडे, एमडी ड्रग्स, कोडीन सिरप आदींचा समावेश आहे. दरम्यान, अन्न व औषध प्रशासनातर्फेही गुटखा, सुगंधी तंबाकूचा मोठा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

दरम्यान, महाराष्ट्र शासनाच्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय कामकाजाचे सकारात्मक परिणामही जिल्ह्यात ठळकपणे दिसू लागले आहेत. आंतरराष्ट्रीय नशा विरोधी दिनाचे औचित्य साधून धुळे जिल्हा पोलीस दलाच्या वतीने जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल झालेल्या २३ गुन्ह्यांतील गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारांवर परिणाम करणारे अंमली पदार्थ कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून नष्ट करण्यात आले.

नष्ट करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये एक कोटी ८० लाख ३० हजार रुपये किंमतीचा ९०१.५०६ किलो गांजा, २६ लाख आठ हजार ५०० रुपये किंमतीची १७३.९० किलो अफूची बोंडे, ९ हजार ४०० रुपये किंमतीचे ९४ ग्रॅम एमडी ड्रग्स, तीन लाख रुपये किंमतीचे कोडीन कफ सिरप तसेच २२० स्ट्रिप अल्प्राझोलम गोळ्यांचा समावेश होता. एकूण दोन कोटी नऊ लाख ४९ हजार ३८० रुपये किंमतीचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला.

यावेळी जिल्हास्तरीय प्रादेशिक अंमली पदार्थ नाश समितीचे अध्यक्ष तथा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, सदस्य (पान ४ वर)

## लोकसभेसाठी पूर्ण कंबर कसलीय-नवनीत राणा

अमरावती दि.२६ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारल्यानंतर त्यांच्या रिक्त झालेल्या राज्यसभेच्या जागेसाठी अमरावतीच्या माजी खासदार नवनीत राणा यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू होती. मात्र, राष्ट्रवादीकडून अखेर राजेंद्र जैन यांना उमेदवारी देण्यात आली आणि महाविकास आघाडीकडून कोणीही अर्ज न भरल्यामुळे जैन यांची बिनविरोध निवड झाली. दरम्यान, नवनीत राणा राज्यसभेच्या तिकिटासाठी राष्ट्रवादीच्या दारात गेल्याची टीका विरोधकांकडून केली जात होती. या सर्व टीकेला नवनीत राणा यांनी आपल्या आक्रमक भाषणातून जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.

नवनीत राणा म्हणाल्या की, 'आमच्या विरोधात सर्व नेते आहे. पण, रवी राणा चौथ्यांदा आमदार झाले आहे. राज्यसभेसाठी मी सुनेत्रा पवार आणि देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानते. अनेक लोक माझे शुभचिंतक आहे, त्यांनी म्हटलं की, (पान ४ वर)

## आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केल्यास जेल भरो, रोहित पवारांचा सरकारला इशारा

हिंगोली दि.२६ (प्रतिनिधी)- जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला दडपण्याचा प्रयत्न झाल्यास त्याला चोख प्रत्युत्तर दिले जाईल असा इशारा आमदार रोहित पवार (राष्ट्रवादी शरद पवार गट) त्यांनी दिला आहे.



हिंगोली येथील राष्ट्रवादी भवनात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी बोलताना ते म्हणाले की, शेतकरी व सर्व सामान्यांच्या प्रश्नांसाठी आंदोलन उभारले जात आहे. आंदोलनाला लोकांचा मिळणारा प्रतिसाद पाहून सरकारकडून पोलिसांचा वापर करून अडथळा निर्माण केला जाण्याची शक्यता आहे. जर पोलिसांनी आंदोलनाला रोखण्याचा प्रयत्न केला, तर रास्ता रोको आंदोलनाचे रूपांतर जेल भरो आंदोलनात केले जाईल असे त्यांनी स्पष्ट केले.

हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बोलताना पवार म्हणाले की, गेल्या वर्षी जिल्ह्यात साडेचार लाख हेक्टरवर पिकांचे नुकसान झाले होते. यासाठी शासनाकडून १२०० कोटी रुपयांची मदत मिळणे अपेक्षित होते, मात्र ती अद्याप मिळालेली नाही. जिल्ह्यातील बहुतांश आमदार सत्ताधारी महायुतीचे असतानाही त्यांना जनतेसाठी हक्काचा निधी मिळवून देता आला नाही, यावरून सत्तेत राहून ते भजी तळत होते का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. विकास करण्यासाठी आम्ही सत्ताधाऱ्यांसोबत गेलो असे सांगणाऱ्या खासदारांवरही त्यांनी सडकून टीका केली. डीलिमिटेशन कायदा पास करण्यासाठी या खासदारांना सामावून घेण्यात आले असून, त्यांना ६० कोटी ते ९० कोटी रुपयांपर्यंतचा निधी वैयक्तिक (पान ४ वर)

## विलास घुले हत्या प्रकरणात ९ आरोपींना अटक, मग एकाला का नाही? तो लाडका आहे का?, धनंजय मुंडेंचा सवाल

बीड दि.२६ (प्रतिनिधी)- विलास घुले हत्या प्रकरणावरून बीड जिल्ह्यातील राजकारण चांगलंच तापलं आहे. या प्रकरणावरून आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. विलास घुले यांच्या हत्येच्या प्रकरणातील सूत्रधार कोण? याचा शोध घेण्याची मागणी परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी विधानसभेत केली. त्यानंतर आज धनंजय मुंडे यांनी विलास घुले यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी धनंजय मुंडे यांनी गंभीर आरोप केले आहेत.

'विलास घुले हत्या प्रकरणात पोलिसांनी ९ आरोपींना अटक केली आहे, मग एका आरोपीला अटक का केली नाही? तो लाडका आहे का?', असं म्हणत आमदार धनंजय मुंडे यांनी गंभीर आरोप केले आहेत.

"विलास घुले हत्या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक होण्याची गरज आहे. या घटनेतील ९ आरोपींना पोलिसांनी अटक केली. मात्र, आणखी एका आरोपीला अटक केलेलं नाही. तो एक आरोपी पोलिसांचा लाडका आहे का? हे मला ज्या व्यासपीठावर बोलायचं, त्या व्यासपीठावर मी बोलेन.पण ३०२ मध्ये एखाद्या आरोपीला अटक होत नाही, का? तर त्याची वेगळी तपासणी सुरू आहे. त्या एका व्यक्तीला पोलिसांना या प्रकरणातून बाहेर काढायचं आहे का? या घटनेतील जे काही पुरावे आहेत, ते नष्ट करण्यासाठी त्या आरोपीला बाहेर ठेवलं जात आहे का?", असे सवाल धनंजय मुंडे यांनी केले आहेत.

"विलास घुले हत्या प्रकरणातील एक आरोपी अजूनही मोकाट आहे. त्यामुळे ही भिती आहे की त्या आरोपीने जर या घटनेतील काही पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला, तर या प्रकरणातून काय बाहेर येईल? आमचा आता पोलिसांवर असा संशय आहे की त्यांना या प्रकरणात एका आरोपीला वाचवायचं आहे. त्यामुळे पोलीस त्याला अटक करत नाही. आज आम्ही सर्वांच्या उपस्थितीत सांगतो की त्या आरोपीला पोलिसांनी अटक करावी एवढ्या ताकदीने आम्ही रस्त्यावर उतरू. आम्ही शांत बसणार नाही. एखाद्या गुन्ह्यात एकाला एक न्याय आणि दुसऱ्या गुन्ह्यात दुसऱ्याला वेगळा न्याय?", असंही धनंजय मुंडे यांनी म्हटलं आहे.

"विलास घुले हत्या प्रकरणातील सूत्रधाराबाबत अनेक जणांनी साक्ष दिली, पण पोलीस ती साक्ष मानायला तयार नाहीत. मग नेमकी कुठली साक्ष पोलिसांना पाहिजे? या बाबतीत हे प्रकरण आम्ही अतिशय गांभीर्याने घेतलं. या घटनेबाबत मी विधानसभेत देखील प्रश्न उपस्थित केले आहेत. या प्रकरणातील एक आरोपी, मग तो कोणाचाही असो, मला देणंघेणं नाही. मात्र, न्याय हा सर्वांना सारखाच असला पाहिजे", असंही धनंजय मुंडे यांनी म्हटलं आहे.

## 'देवाभाऊ टॅक्सी' प्रवीण दरेकरांचा नवा घोटाळा? पत्रकार परिषदेत अंजली दमानियांचा गंभीर आरोप

मुंबई दि.२६ (प्रतिनिधी)- विधान परिषद आमदार प्रवीण दरेकर आणि मुंबई बँकेच्या कारभारावर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पत्रकार परिषदेत अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. नव्याने सुरू होणाऱ्या देवाभाऊ टॅक्सी योजनेमागे मोठा भ्रष्टाचार आणि मनी लॉंड्रिंग असल्याचा दावा दमानिया यांनी केला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे उदात्तीकरण करण्यासाठी सामान्य लोकांच्या पैशांचा गैरवापर होत असल्याचा घणाघात त्यांनी केला आहे.

दमानिया यांच्या म्हणण्यानुसार, देवदत्त सहकारी पर्यटन व वाहतूक संस्था मर्यादित ही एक बोगस संस्था आहे. ही संस्था ४ डिसेंबर २००१ रोजी स्थापन झाली, पण गेल्या २५ वर्षांत त्यांच्याकडे एकही गाडी नाही, कोणतीही उलाढाल नाही किंवा त्यांनी कधीही संस्थेची निवडणूक घेतलेली नाही. "२०१८ मध्ये निवडणूक का घेतली नाही?" या प्रश्नावर संस्थेने, २०१८ साली कोविडमुळे लॉकडाऊन होता असे खोटे आणि हास्यास्पद कारण लेखी स्वरूपात दिल्याचे दमानिया यांनी उघड केले. या संस्थेतील २८ सदस्यांच्या सह्या बोगस असल्याचा संशय आहे. एकाच व्यक्तीची २००१ मधील सही मराठीत आणि २०१३ मधील सही स्टायलिश इंग्रजीत असल्याचे त्यांनी समोर आणले. ही संस्था क श्रेणीमध्ये मोडते आणि २०२३-२४ मध्ये तिचा निव्वळ नफा फक्त ९४१ रुपये होता.

संस्थेची आर्थिक स्थिती इतकी बिकट असताना आणि त्यांच्या मुंबई बँकेतील खात्यात सध्या शून्य रुपये शिल्लक असताना, प्रवीण दरेकर यांनी या संस्थेला मुंबई बँकेकडून २ हजार गाड्यांसाठी कर्ज देण्याची घोषणा केली आहे. "हा पैसा सामान्य कष्टकरी लोकांचा आणि सहकारी संस्थांचा असून तो या बोगस संस्थेसाठी वापरला जात आहे," असा आरोप दमानिया यांनी केला. केंद्र सरकारने भारत टॅक्सी योजना सुरू केली असून, महाराष्ट्राने त्याला पाठिंबा देणे गरजेचे होते. मात्र, अमित शहांची भारत टॅक्सी डावलून या योजनेला देवेंद्र फडणवीस यांचे देवाभाऊ टॅक्सी असे नाव देण्यात आले आहे. "देवेंद्र फडणवीस यांचे उदात्तीकरण करण्यासाठी आणि सरकारी कामात कुठेही अडवणूक होऊ नये म्हणून हे नाव दिले गेले आहे. ओला-उबरला पर्याय म्हणून टॅक्सी सेवा येणे गरजेचे आहे, पण त्याला सामान्यांची टॅक्सी किंवा महाराष्ट्र टॅक्सी असे नाव द्यावे, देवाभाऊ टॅक्सी हे नाव आम्हाला मान्य नाही," असे दमानिया म्हणाल्या.

## उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीसांचा एकाच विमानातून प्रवास

मुंबई दि.२६ (प्रतिनिधी)- राज्यात ऑपरेशन टायगरच्या माध्यमातून सहा खासदारांनी उद्धव ठाकरेंची साथ सोडली. त्यानंतर आता देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे हे एकाच विमानातून मुंबई ते नागपूर प्रवास करताना दिसून आलं. दरम्यान, 'आपण भेटलो हीच मोठी बातमी आहे' असं देवेंद्र फडणवीसांनी उद्धव ठाकरेंना म्हणाल्याची माहिती आहे. यावेळी देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांची चर्चा झाली असून दोन्ही नेत्यांनी एकमेकांची विचारपूस केल्याची माहिती आहे. तसेच देवेंद्र फडणवीस आणि संजय राऊत यांचीही चर्चा झाल्याचं दिसून आलं.

# पेरणीयोग्य पावसाची प्रतीक्षा

प्रतीक्षेनंतर मराठवाड्यात मान्सूनने अखेर हजेरी लावली असली तरी पेरणीसाठी आवश्यक असलेल्या दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. काही जिल्ह्यांत झालेल्या जोरदार पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत, तर अनेक भागांतील शेतकरी अजूनही समाधानकारक पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. महिनाभरापासून दडी मारलेल्या मान्सूनने अखेर मराठवाड्यात हजेरी लावली आहे. त्यामुळे रखडलेल्या पेरण्यांना काहीसा वेग मिळण्याची शक्यता आहे. मंगळवार आणि बुधवारी मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाने जोरदार हजेरी लावली. यामध्ये सर्वाधिक पाऊस छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यांत नोंदवला गेला. मात्र बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांमध्ये अद्यापही पेरणीयोग्य पाऊस झालेला नाही. त्यामुळे येथील शेतकरी अजूनही दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. महसूल विभागाच्या निकषानुसार, २४ तासांत ६५ मिलिमीटरपेक्षा अधिक पाऊस झाल्यास संबंधित मंडळात अतिवृष्टी झाल्याचे मानले जाते. दरम्यान, जालना जिल्ह्यात सर्वाधिक २१.० मिलिमीटर, तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १९.९ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगाव परिसरात ढगफुटीसदृश पाऊस झाला, तर जरंडी गावाजवळील मातीचा पूल पावसामुळे वाहून गेल्याने या मार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. तसेच पुराच्या पाण्यात एक दुचाकी वाहून गेली होती. मात्र ग्रामस्थांनी तत्परता दाखवत दुचाकीस्वाराचा जीव वाचवला. परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यात पावसानंतर ओढे आणि नाल्यांना पूर आला. आडगाव बाजार ते आडगाव फाटा या रस्त्यावरील वाहतूक काही काळ पूर्णपणे बंद झाली होती. त्यामुळे ग्रामस्थ आणि वाहनधारक पुराच्या पाण्यात अडकले होते. परभणी शहरात बुधवारी सकाळपासून हलक्या पावसाला सुरुवात झाली. जिल्ह्यातील पाथरी, मानवत, जिंतूर, येलदरी, सेलू, बोरी, आसेगाव आणि ताडकळस या भागांतही पावसाने चांगलीच हजेरी लावली.

नांदेड जिल्ह्यातील हदगाव, अर्धापूर, मुखेड, कंधार आणि मुदखेड या भागांत मेघगर्जनेसह दमदार पाऊस झाला. हदगाव येथे तब्बल तीन तास मुसळधार पाऊस कोसळला. या पावसामुळे नदी-नाले दुथडी भरून वाहू लागले असून काही भागांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले होते. नांदेड जिल्ह्यात आतापर्यंत ८ टक्के पेरण्या पूर्ण झाल्या होत्या. आता शेतीत पुरेसा ओलावा निर्माण झाल्याने उर्वरित पेरणीच्या कामाला वेग येण्याची शक्यता आहे. धाराशिव जिल्ह्यातील शेतकरीही पेरणीयोग्य पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. २४ जूनपर्यंत धाराशिव जिल्ह्यात सरासरीच्या १२.९ टक्के इतक्या पावसाची नोंद झाली आहे. हिंगोली जिल्ह्यात बुधवारी जोरदार पाऊस झाला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. मृग नक्षत्र कोरडे गेल्याने शेतकऱ्यांच्या चिंता वाढल्या होत्या; मात्र आता पावसाने हजेरी लावल्याने हिंगोली जिल्ह्यातील शेतजमिनींमध्ये पाणी साचले आहे. मराठवाड्यात सर्वाधिक पाऊस जालना जिल्ह्यात झाल्याची नोंद आहे. जिल्ह्यातील चार महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली. रामनगर महसूल मंडळात १०९ मिलिमीटर, धनगर पिंपरी येथे ९१ मिलिमीटर, तर जालना शहर आणि पाचनवडगाव येथे प्रत्येकी ८७ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. अंबड शहरात ५३ मिलिमीटर पाऊस झाला. मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत झालेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून अनेक भागांतील शेतकऱ्यांनी पेरणीला सुरुवात केली आहे. बीड जिल्हा वगळता इतर जिल्ह्यांत कमी-अधिक प्रमाणात पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पेरणीची लगबग सुरू झाली आहे. दरम्यान, राज्यात मान्सून वेगाने पुढे सरकत आहे. बुधवारी उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील उर्वरित भागांत प्रगती करत मान्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापल्याची माहिती हवामान विभागाने दिली. पुढील तीन दिवस मराठवाडा आणि विदर्भात मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

सध्या मराठवाड्यात ढगाळ वातावरण निर्माण झाले असून काही ठिकाणी अधूनमधून भुरभुर पाऊस पडत आहे. त्याम ुळे लवकरच दमदार पावसाला सुरुवात होईल, अशी आशा शेतकऱ्यांना लागली आहे. मराठवाड्यातील काही जिल्ह्यांम ध्ये खरीप हंगामासाठी पोषक वातावरण तयार झाले असून शेतकऱ्यांमध्ये पेरणीबाबत उत्सुकता वाढली आहे. मात्र, हवाम ान विभागाने किमान १०० मिलिमीटर पाऊस झाल्यानंतरच पेरणी करण्याचे आवाहन केल्याने अनेक भागांतील शेतकऱ्यांनी सध्या पेरणी थांबवली आहे. काही ठिकाणी पावसाची सम ाधानकारक स्थिती असली तरी अनेक भागांमध्ये अजूनही दम दार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. त्यामुळे शेतकरीही संभ्रमात असल्याचे चित्र आहे. २४ जूनच्या पावसानंतर मराठवाड्यातील शेतकरी खरीप पेरणीच्या तयारीला लागले असून बियाणे व खत खरेदीसाठी कृषी सेवा केंद्रांवर गर्दी वाढली आहे. शेतकऱ्यांनी कृषी पंपांसाठी दिवसा किमान आठ तास वीजपुरवठ्याची म ागणी केली आहे. दिवसा वीज मिळाल्यास शेतीचे नियोजन सुधारेल आणि मराठवाड्यातील शेतीला मोठी चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी १५ हजारांचे अर्थसहाय्य; ३१ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. २६ (प्रतिनिधी) - जिल्हा परिषदेच्या सहायक आयुक्त दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयामार्फत दिव्यांग व्यक्तींसाठी स्वयंरोजगार साधनसामग्री (ढेश्रज्ञळीं) खरेदी करण्याकरिता नवीन योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांकडून ऑफलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. पात्र लाभार्थ्यांना साधनसामग्रीसाठी कमाल १५,००० रुपयांपर्यंत आर्थिक मदत मिळणार आहे. यात अर्जदाराचे वय १८ वर्षांपेक्षा जास्त असावे आणि त्याने शासकीय किंवा शासनमान्य संस्थेतून कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे.

प्रशिक्षित दिव्यांग महिलांना या योजनेत प्राधान्य दिले जाईल. अर्ज करण्याची मुदत २५ जून २०२६ ते ३१ जुलै २०२६ पर्यंत आहे. अर्जदारांनी ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेले युडीआयडी प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, प्रशिक्षण प्रमाणपत्र, बँक पासबुक प्रत आणि घोषणापत्र इत्यादी कागदपत्रे जोडून अर्ज 'सहायक आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर' येथे सादर करावा. जिल्ह्यातील जास्तीत जास्त दिव्यांग व्यक्तींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त श्री. बाबासाहेब अरवत यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना : ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी उभारी !




भारत हा कृषिप्रधान देश असून देशाच्या अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. शेती हा राज्याच्या अर्थव्यवस्थेतील एक महत्वाचा घटक आहे. महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर राहणाऱ्यांना उपजीविका देण्याचे काम हा महत्वपूर्ण घटक करतो. म्हणूनच शेती हा घटक अन्न सुरक्षा,रोजगार आणि ग्रामीण विकासामध्ये महत्वाची भूमिका बजावतो.

मात्र गेल्या काही वर्षांपासून सतत होणारे हवामान बदल, जमीन आणि पाण्याची टंचाई, बियाणे आणि खतांवरील वाढता खर्च आणि बाजारपेठेतील अनिश्चितता यामुळे शेतीसमोर अनेक आव्हाने दिवसेंदिवस वाढत आहेत. या समस्येचे निराकरण करण्यासाठी राज्य शासन अनेक उपाययोजना करत असते जसे की, शेतीचे उत्पादन वाढविणे, हवामान बदलास अनुकूल आणि शाश्वत शेतीला चालना देणे, सिंचन व्यवस्था आणि जलसंधारणात सुधारणा करणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे. याशिवाय शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरासाठी प्रोत्साहित करणे, शेतकरी गटांना बळकट करणे आणि बाजारपेठ उपलब्धतेत सुधारणा आणणे यासारखेही प्रयत्न केले जात आहेत.

मात्र आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी गेली काही वर्षे अनेक नैसर्गिक व आर्थिक संकटांचा सामना करत आहेत. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, कधी गारपीट यामुळे शेतपिकांचे प्रचंड प्रमाणावर नुकसान होत आहे. या सगळ्याचा परिणाम अनेकदा वाढता उत्पादन खर्च आणि शेतीमालाला मिळणारा अपुरा भाव यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होतात. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी शासनाकडून राबविण्यात येणारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना महत्त्वाची ठरते. शेतकरी कर्जमुक्ती योजना म्हणजे शेतकऱ्यांनी बँका किंवा वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जाची संपूर्ण किंवा अंशतः माफी. शासनाच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी होतो, आणि त्यांना नव्याने शेती व्यवसाय उभा करण्याची संधी मिळते. कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांच्या मानसिक तणावात घट होते. तसेच त्यांच्या आर्थिक स्थैर्याला आधार मिळतो. कर्जमुक्तीनंतर शेतकरी नव्याने पीक कर्ज घेऊन शेतीमध्ये गुंतवणूक करू शकतात. यामुळे उत्पादन वाढीस मदत होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी उभारी मिळणार आहे.

तथापि, कर्जमुक्ती हा शेतकऱ्यांच्या समस्यांवरील कायमस्वरूपी उपाय नाही. शेती क्षेत्रातील मूलभूत अडचणी दूर करण्यासाठी सिंचन सुविधा, पीकविमा, साठवणूक व्यवस्था, बाजारपेठेपर्यंत थेट पोहोच, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि शेतीमालाला योग्य हमीभाव यांसारख्या उपाययोजनांची आवश्यकता आहे. शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे. त्याच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि शेती व्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी कर्जमुक्तीसारख्या योजनांची भूमिका महत्त्वाची आहे. मात्र, दीर्घकालीन विकासासाठी शाश्वत कृषी धोरणे आणि सर्वसमावेशक ग्रामीण विकास हाच खरा मार्ग आहे. शेतकरी सक्षम झाला तरच देशाची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल आणि ग्रामीण भारताच्या विकासाला नवी दिशा मिळेल.

**राज्य शासनाकडून शेतकऱ्यांसाठी विविध योजना**

राज्य शासनाकडून शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविल्या जातात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वालंबन योजना, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, नमो शेतकारी महासन्मान निधी योजना, प्रधानमंत्री किसान मानधन योजना राबविल्या जातात. यामध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांना विविध प्रकारचे आर्थिक सहाय्य देण्यात येते. याशिवाय प्रधानमंत्री पीक विमा योजना आणि हवामानावर आधारित फळपिक विमा योजना याद्वारे नैसर्गिक आपत्ती, कीड किंवा रोगांमुळे पीक आणि फळपिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येते. किमान आधारभूत किंमत योजना इलेक्ट्रॉनिक राष्ट्रीय कृषी बाजार असे उपक्रम सुद्धा गेल्या काही वर्षात सुरू करण्यात आले आहेत.

ङकृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्ता (ँघ) याचा वापरङ महाराष्ट्रात करण्यात येत आहे. राज्य शासनाने कृत्रिम बुद्धीमत्ता आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून कृषी क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी 'महाराष्ट्र कृषी कृत्रिम बुद्धीमत्ता धोरण (महा कृषी एआय)' २०२५-२०२९ आणले आहे. याअंतर्गत शेतकऱ्यांना उपग्रह तंत्रज्ञान आणि भौगोलिक माहितीच्या आधारे पिकांची स्थिती, जमिनीचा ओलावा आणि इतर भौगोलिक घटकांचे विश्लेषण करणाऱ्या प्रणालीचे विकसन व अंमलबजावणी करण्यात येणार आहे. कृषी आणि अन्न उत्पादनाच्या खरेदी- व्रिकीसाठी एआय आधारित प्लॅटफॉर्म विकसित करण्यात येणार आहे.

**शेतकऱ्यांना देण्यात येणारी कर्जमुक्ती हा शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे साधन**

शेतकऱ्यांना देण्यात येणारी कर्जमुक्ती हा शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे साधन आहे. या योजनेअंतर्गत ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी करण्यात येणार असून सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना त्याचा लाभ होणार आहे. ही राज्यातील सर्वात मोठी कर्जमुक्ती आहे.कर्जमुक्ती हा कायमस्वरूपी उपाय नसला तरी अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तो आवश्यक ठरतो. शेतकरी पुन्हा उभा राहावा आणि त्याला नव्याने कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा व्हावा, यासाठी कर्जमुक्तीकडे राज्य शासन एक महत्त्वाचे साधन म्हणून पाहते. राज्य शासनाने कर्जमाफीसंदर्भात तज्ज्ञ समिती नेमून या समितीला अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजना, तसेच बँकिंग व्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्याची जबाबदारी दिली होती. समितीच्या अहवालाच्या आधारे काही निकष निश्चित करण्यात आले आहेत.

राज्य महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विविध कर्जमाफी योजना राबविल्या आहेत. दुष्काळ, अतिवृष्टी आणि इतर संकटांमुळे प्रभावित झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य शासनाने विविध कालखंडात कर्जमुक्तीचे निर्णय घेतले. या योजनांमुळे लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून त्यांना पुन्हा शेती व्यवसाय उभा करण्याची संधी मिळाली.

**शेतकऱ्यांच्या समस्या केवळ कर्जमाफीने पूर्णपणे सुटू शकत नाहीत. त्यासाठी पुढील उपाय महत्त्वाचे ठरणार आहेत:**

* सिंचन सुविधांचा विस्तार
* पीकविमा योजनांची प्रभावी अंमलबजावणी.
* शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर.
* साठवणूक व प्रक्रिया उद्योगांची उभारणी.
* शेतीमालाला योग्य व हमीभाव.
* शेतकरी उत्पादक कंपन्या आणि सहकारी संस्थांचे बळकटीकरण.
* कृषी शिक्षण व कौशल्य विकास.
* हवामान बदलाशी सुसंगत शेती पद्धतींचा प्रसार.

शेतकरी कर्जमुक्ती ही आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी दिलासादायक आणि आवश्यक उपाययोजना आहे. ती शेतकऱ्यांना नव्याने उभे राहण्याची संधी देणार आहे. याशिवाय ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास मदत होणार आहे. येत्या काळात शाश्वत कृषी विकासासाठी सिंचन, तंत्रज्ञान, बाजारपेठ, विमा आणि योग्य किंमत या घटकांचा समन्वय महत्वाचा ठरणार आहे. शेतकरी सक्षम झाला तरच देशाची अन्नसुरक्षा, ग्रामीण विकास आणि आर्थिक प्रगती अधिक बळकट होणार आहे.

**वर्षा फडके-आंधळे**
उपसंचालक (वृत्त)
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालयं

# आपण ज्वालामुखीवर बसलो आहोत का?

**लोहगडावर** एका तरुणाची हत्या होते. मुंबईच्या लोकलमध्ये किरकोळ वादातून एका प्रवाशाला भोसकून मारलं जातं. रस्त्यावर हॉर्न वाजवला म्हणून मारामारी होते. पार्किंगच्या जागेवरून जीव घेतले जातात. सोशल मीडियावर झालेले वाद प्रत्यक्ष हिंसेपर्यंत पोहोचतात. या घटना वाचताना आपण डोकं हलवतो, दोन मिनिटं हळहळ व्यक्त करतो आणि पुढच्या बातमीकडे वळतो. पण एक प्रश्न विचारत नाही की या सगळ्या घटना खरंच वेगळ्या आहेत का? की त्या एका मोठ्या संकटाच्या लहान लहान ठिणग्या आहेत?

मला दिवसेंदिवस असं वाटू लागलं आहे की आपण एका प्रचंड ज्वालामुखीच्या वर राहतो आहोत. वरून सगळं सुरळीत दिसतं. मॉल्स भरलेले आहेत. महामार्ग बांधले जात आहेत. मोबाईलमध्ये रील्स सुरू आहेत. शेअर बाजार नवे उच्चांक गाठत आहेत. पण जमिनीखाली प्रचंड दाब साचत चालला आहे. सामान्य माणसाच्या राग, निराशा, असुरक्षितता, अन्यायाची भावना आणि हतबलता यांचा दाब.

आजचा सामान्य माणूस सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत एका अदृश्य शर्यतीत धावत असतो. नोकरी टिकवायची आहे. मुलांचं शिक्षण सांभाळायचं आहे. घराचा हप्ता भरायचा आहे. पेट्रोल, वीज, गॅस, आरोग्य, शिक्षण यांचे प्रचंड वाढते खर्च पेलायचे आहेत. शहरांमध्ये घरं परवडत नाहीत. गावात संधी नाहीत. बेकारीचं संकट आहे. नोकरी असली तरी भविष्याची खात्री नाही. आयुष्य म्हणजे जणू सतत तारेवरची कसरत झाली आहे.

त्यातच प्रत्येकाच्या हातात मोबाईल आला आहे जो चोवीस तास त्याला सांगत असतो की तो अपुरा आहे. कोणीतरी परदेशात फिरत आहे. कोणीतरी नवी कार घेत आहे. कोणीतरी करोडपती झाला आहे. कोणीतरी आलिशान जीवन जगत आहे. स्क्रीनवर दिसणाऱ्या या जगाशी स्वतःची तुलना करताना माणूस नकळत निराश होत जातो. त्याच्या अपेक्षा वाढतात, पण त्या पूर्ण करण्याची साधनं वाढत नाहीत. परिणाम म्हणून मनात एक खोल असंतोष निर्माण होतो.

पूर्वी एकत्र कुटुंबं होती. घरात चार लोक असायचे. अडचणी वाटून घेणारे हात असायचे. आज शहरांमध्ये लाखो लोक गर्दीत राहतात, पण एकटे असतात. शेजाऱ्याचं नाव माहीत नसतं. मित्रांशी संवाद स्क्रीनवर होतो. कुटुंबात संवाद कमी होतो. मानसिक आधार कमी होतो. एकटेपणा वाढतो. नैराश्य वाढतं. पण त्याबद्दल बोलण्याची तयारी समाजात अजूनही नाही.

या सगळ्याच्या पार्श्वभूमीवर समाजात वाढणारी हिंसा ही अचानक निर्माण झालेली गोष्ट नाही. ती आत साचलेल्या दाबाची बाहेर पडणारी वाफ आहे. एखाद्या क्षुल्लक कारणावरून होणारा खून, रोड रेजमध्ये होणारी मारहाण, गर्दीत अचानक भडकणारा संताप हे सर्व त्या दाबाची लक्षणं आहेत. ज्वालामुखी फुटण्याआधी जशा छोट्या भेगा पडतात, तशाच या घटना आहेत.

पण या परिस्थितीसाठी फक्त सामान्य माणसालाच दोष देता येणार नाही. कारण त्याच्या सभोवताली उभं राहिलेलं व्यवस्थेचं चित्रही तितकंच भयावह आहे. राजकारणात विचारापेक्षा सत्तेची स्पर्धा अधिक दिसते. जनतेच्या प्रश्नांपेक्षा सत्तेची गणितं महत्त्वाची वाटतात. भ्रष्टाचारी नेते स्वतःच्या आणि त्यांच्या पुढील सात पिढ्यांच्या फायद्याचे निर्णय घेतात. पण त्याचे परिणाम भोगावे लागतात ते सामान्य नागरिकांना. कर वाढतात, शुल्क वाढतं, नियम वाढतात.. पण सुविधा, न्याय आणि उत्तरदायित्व त्याच प्रमाणात वाढताना दिसत नाही. कराच्या ओझ्याखाली दबलेला सामान्य माणूस अतिसामान्य आयुष्य जगत राहतो!

कायद्याचा धाक सर्वांसाठी समान आहे असं पुस्तकात लिहिलं जातं. प्रत्यक्षात मात्र सामान्य माणूस नियमांच्या, कायद्यांच्या जाळ्यात अडकतो आणि प्रभावशाली लोक अनेकदा त्यातून सहज बाहेर पडताना दिसतात. सामान्य माणसाच्या पगारातून टीडीएस कापून घेतला जातो आणि राजकारणी हजारो कोटी रुपयांची माया राजरोज जमवून आलिशान घरात लोळतात! न्यायालयात दाखल केलेले खटले वर्षानुवर्षे चालतात. वकिलांच्या सात पिढ्या बसून खातील इतके पैसे जनतेच्या खिशातून खर्च होतात. पण अनेकांना न्याय मिळेपर्यंत आयुष्य संपतं. अशा वेळी व्यवस्थेवरचा विश्वास कमी होतो. आणि जेव्हा लोकांचा व्यवस्थेवरचा विश्वास कमी होतो, तेव्हा समाज धोकादायक वळणावर पोहोचतो.

यात आणखी एक संकट भर घालत आहे. ते म्हणजे सामाजिक विषमता. एका बाजूला हजारो धनदांडग्या उद्योजक, नट आणि राजकारणी ह्यांच्या कोटींच्या संपत्तीची चर्चा आणि नुमाईश होते. तेव्हा दुसऱ्या बाजूला लाखो लोक रोजच्या खर्चासाठी झगडत असतात. एका बाजूला आलिशान टॉवर्स उभे राहतात. दुसऱ्या बाजूला झोपडपट्ट्या वाढतात. सध्या भारतात प्रचंड वेगाने दोन भारत निर्माण होत आहेत. एक प्रचंड वेगाने पुढे जाणारा आणि दुसरा तिथेच अडकून पडलेला. ही दरी जितकी वाढेल तितका समाजातील असंतोषही वाढणार.

आणि या सगळ्यावर ग्लोबल वॉर्मिंगचं संकट आहे. वाढतं तापमान, पाण्याची टंचाई, अनियमित पाऊस, शेतीसमोरील आव्हानं, स्थलांतर आणि संसाधनांवरील ताण. पर्यावरणीय संकट हे केवळ हवामानाचं संकट नसतं. ते आर्थिक, सामाजिक आणि राजकीय संकटांनाही जन्म देतं.

आज आपण ज्या घटना पाहतो आहोत त्या स्वतंत्र नाहीत. त्या एका मोठ्या चित्राचे तुकडे आहेत. प्रत्येक खून, प्रत्येक रोड रेज, प्रत्येक क्षुल्लक कारणावरून उफाळून येणारा संताप, प्रत्येक नैराश्याने भरलेला चेहरा हे सर्व एका खोल सामाजिक अस्वस्थतेची चिन्हं आहेत. समाज जेव्हा आशा गमावतो, तेव्हा तो धोकादायक बनतो. कारण भुकेला माणूस, अन्याय सहन करणारा माणूस आणि भविष्याबद्दल निराश झालेला माणूस यांच्यापेक्षा अस्थिर शक्ती दुसरी नसते. इतिहासात अनेक वेळा वरून स्थिर दिसणारे समाज अचानक कोसळले आहेत. कारण समस्या एका दिवसात निर्माण होत नाहीत. त्या वर्षानुवर्षे साचत राहतात. आणि मग एका क्षणी एखादी छोटी ठिणगी मोठ्या आगीत रूपांतरित होते.

म्हणून प्रश्न आज लोहगडावरील खुनाचा नाही. प्रश्न लोकलमधील भोसकाभोसकीचाही नाही. प्रश्न असा आहे की या घटना आपल्याला कोणती चेतावणी देत आहेत? कदाचित अजूनही उशीर झालेला नसेल. कदाचित अजूनही हा ज्वालामुखी शांत करण्याची संधी उपलब्ध असेल. पण त्यासाठी केवळ रस्ते, पूल, विमानतळ आणि इमारती बांधणे पुरेसे नाही. त्याच्याही पलीकडे जाऊन लोकांच्या आयुष्यातील तणाव कमी करावा लागेल. लोकसंख्या कमी करण्यासाठी सर्वात जास्त प्रयत्न आणि तरदूद करावी लागेल. न्यायव्यवस्था सक्षम करावी लागेल. कागदावर आणि भाषणात नाही तर खरेखुरे रोजगार निर्माण करावे लागतील. सामाजिक विषमता कमी करावी लागेल. राजकारणाला पुन्हा लोकांच्या प्रश्नांकडे वळावं लागेल. हल्ली प्रकर्षाने एक विचार मनात येतो की अराजक आणि यादवीचा ज्वालामुखी आपल्या भुसभुशीत होणाऱ्या सामाजिक जमिनीखालून जे धक्के देतो आहे ते कोणालाच कळत नाहीयेत का? त्याकडे दुर्लक्ष केल्यास ह्या ज्वालामुखीचा लवकरच उद्रेक होईल. आणि उद्रेक झालेल्या ज्वालामुखीचा लाव्हा कोणताही भेदभाव करत नाही. तो गरीब-श्रीमंत, डावा-उजवा, सत्ताधारी-विरोधक असा भेद करत नाही. तो जे दिसेल ते सर्व फक्त जाळून टाकतो! आणि आजूबाजूला घडणाऱ्या घटना पाहिल्या की एक प्रश्न अस्वस्थ करतो की आपण त्या दिवसाच्या किती जवळ आलो आहोत? हा प्रश्न तुम्हाला अस्वस्थ करत नाही का?

**- मंदार जोग**

# उस्मानपुरा मनपा प्राथमिक विद्यालयात हॅण्ड वॉश स्टेशन व वॉशरूमचे लोकार्पण




छत्रपती संभाजीनगर, दि. २५ (प्रतिनिधी) – लुपिन फाउंडेशन च्या वतीने सीएसआर निधी अंतर्गत मनपा प्राथमिक विद्यालय उस्मानपुरा येथे विद्यार्थ्यांसाठी हॅन्ड वॉश स्टेशन, वॉशरूम बांधून देण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन आज मा. महापौर श्री.समीर राजूरकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी, महिला व बालकल्याण सभापती शोभा बुरांडे, नगरसेविका शिल्पा वाडकर, मनपा उपायुक्त अंकुश पांढरे, लुपिन कंपनीचे प्लांट हेड विष्णुदास असावा, व्यंकटेश शेट्टी, पूजा जैन विकास ढवळे, बाळासाहेब गर्जे, शिक्षण अधिकारी भारत तीनगोटे, कार्यक्रम अधिकारी ज्ञानेश्वर सांगळे, प्रशासन अधिकारी संजीव सोनार, विस्तार अधिकारी विजय कोल्हे व रईसा बेगम, मुख्याध्यापक शशिकांत उबाळे मुख्याध्यापक बाळा जाधव यांची उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना महापौर महोदय

**लुपिन कंपनीने शहराच्या सौंदर्यकरणात सहभाग घ्यावा महापौर समीर राजूरकर यांचे आवाहन**

यांनी लुपिन कंपनींचे वतीने बांधून देण्यात आलेल्या हॅण्ड वॉश स्टेशन व वॉशरूम बद्दल आभार मानले. तसेच महिलांसाठी शौचालय तयार करणे व त्याची देखभाल करणे करिता कंपनीने किमान एक शौचालय तयार करून द्यावे या करिता मनपा प्रशासनाच्या वतीने सहकार्य करण्यात येईल असे ते म्हणाले.

तसेच शहरात प्रवेश करताना पर्यटकांना आपले शहर सुंदर, स्वच्छ दिसावे यासाठी महानगरपालिकेच्या वतीने ठिकठिकाणी सौंदर्यकरण करण्यात येत आहे. या उपक्रमात लुपिन कंपनीने आपला सहभाग नोंदवून प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# गलिच्छ वस्ती निर्मूलन घर बांधणी व समाज कल्याण समिती आढावा बैठक संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि. २६ (प्रतिनिधी) – मनपाच्या गलिच्छ वस्ती निर्मूलन, घर बांधणी व समाज कल्याण समितीची आढावा बैठक मा. सभापती श्री.जालिंदर शेंडगे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

यावेळी समिती सदस्य अशोक दामले,काकासाहेब काकडे नगरसेविका मीना खरात, भाग्यश्री साळवे, सावित्री वाणी, सुनीता वाहुळ अतिरिक्त आयुक्त ०२ कल्पिता पिंपळे, शहर अभियंता संजय कोंबडे, उप आयुक्त तथ नगर सचिव नंदकिशोर भोंबे, अपर्णा थेटे, लाखिचंद चव्हाण, पंतप्रधान आवास योजना विभागातील अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती. यावेळी विविध विषयावर चर्चा करण्यात आली.यात प्रामुख्याने घरकुल, माता रमाई योजना, दिव्यांग योजना, एन यू एल एम, समाज कल्याण समिती, डीपीडीसी याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.

यावेळी समिती सदस्यांनी आपल्या सूचना मांडल्या. या नुसार मां.सभापती यांनी सबंधित अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.



**छत्रपती संभाजीनगर – लोककल्याणकारी राजे, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त अपर जिल्हाधिकारी डॉ. संभाजी अडकूणे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. यावेळी छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते, त्यांनी शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.**

# महापालिकेची धडक कर वसुली मोहीम; एका दिवसात १५ मालमत्ता सील, १.०९ कोटींची वसुली



छत्रपती संभाजीनगर, दि. २५ (प्रतिनिधी): महापालिकेच्या कर वसुली मोहिमेला नागरिकांचा वाढता प्रतिसाद मिळत असून सलग दुसऱ्या आठवड्यातही एका दिवसात विक्रमी कारवाई करण्यात आली. महापालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार गुरुवारी (दि. २५) शहरातील सर्व १० झोनमध्ये विशेष कर वसुली म ोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत तब्बल १५ थकबाकीदार मालमत्ता सील करण्यात आल्या, तर १ कोटी ९ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल करण्यात आला. आयुक्तांच्या सूचनेनुसार अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे आणि उपआयुक्त विकास नवाळे यांनी प्रत्येक झोनसाठी १५ ते २० मोठ्या थकबाकीदारांची यादी तयार करून संबंधित कर वसुली पथकांना कारवाईचे निर्देश दिले होते. त्यानुसार दिवसभर शहरभर धडक मोहीम राबवून थकबाकीदारांवर कारवाई करण्यात आली.

**झोननिहाय कर वसुली व सील कारवाई**

- झोन १: रू २.३८ लाख कर वसुल.
- झोन २: २ मालमत्ता सील, रू १८.६१ लाख कर वसुल.
- झोन ३: रू ६.६३ लाख कर वसुल.
- झोन ४: ५ मालमत्ता सील, रू ८.६१ लाख कर वसुल.
- झोन ५: रू ६.६३ लाख कर वसुल.
- झोन ६: १ मालमत्ता सील, रू ७.२१ लाख कर वसुल.
- झोन ७: २ मालमत्ता सील, रू ९.४३ लाख कर वसुल.
- झोन ८: १ मालमत्ता सील, रू ७.०६ लाख कर वसुल.
- झोन ९: २ मालमत्ता सील, रू २८.८० लाख कर वसुल.
- झोन १०: २ मालमत्ता सील, रू ९.२१ लाख कर वसुल.

या मोहिमेत एकूण १५ मालमत्ता सील करण्यात आल्या असून रू १.०९ कोटींचा कर वसूल करण्यात आला आहे. थकबाकीदारांनी स्वयंस्फूर्तीने मालमत्ता कर भरावा, अन्यथा पुढील काळात अशाच प्रकारची कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा महापालिका प्रशासनाने दिला आहे.

# संपला प्रतीक्षेचा काळ: ‘मिर्झापूर: द मूव्ही’चा दमदार टीझर प्रदर्शित; ४ सप्टेंबरला चित्रपट मोठ्या पडद्यावर

**प्रतीक्षा** अखेर संपली आहे आणि आता ‘भौकाल’ पूर्वीपेक्षा अधिक मोठा झाला आहे. ‘मिर्झापूर: द मूव्ही’चा टीझर प्रदर्शित झाला असून, यंदाच्या सर्वाधिक चर्चेत असलेल्या सिनेमॅटिक इव्हेंट्सपैकी एकाची पहिली झलक प्रेक्षकांना पाहायला मिळाली आहे.

पहिल्यांदाच मिर्झापूरचे आयकॉनिक विश्व ओटीटीवरून थेट सिनेमागृहांकडे वाटचाल करत आहे. आपल्या खास तीव्रतेसह, दमदार कथानकासह आणि भव्य सादरीकरणासह हा चित्रपट आता मोठ्या पडद्यावर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. २०१८ मध्ये पहिल्या सीझनपासून सुरू झालेल्या कथेशी जोडलेली ही कथा मोठ्या पडद्यासाठी खास तयार करण्यात आली असून, या गाथेतील एक अनोखा आणि आतापर्यंत न उलगडलेला अध्याय यात पाहायला मिळणार आहे. ४ सप्टेंबर २०२६ रोजी प्रदर्शित होणारा हा चित्रपट चाहत्यांच्या आवडत्या फ्रँचायझीला एका नव्या थिएटरिकल अवतारात सादर करण्याचे आश्वासन देतो.




या टीझरमध्ये अली फझल, पंकज त्रिपाठी आणि दिव्येंदू यांच्यासह प्रेक्षकांचे पुन्हा एकदा मिर्झापूरच्या दुनियेत स्वागत केले जाते. तसेच जितेंद्र कुमार ‘बबलू पंडित’च्या भूमिकेत दिसणार असून, चाहत्यांचे हे लाडके पात्र पुन्हा एकदा पडद्यावर परतत आहे. याशिवाय रवि किशन यांचीही या गाथेत एंट्री होत असून, त्यांची प्रभावी उपस्थिती मिर्झापूरच्या विश्वात आणखी एक रंजक पैलू जोडणार आहे. पूर्वांचलच्या गल्लीबोळांपासून ते राजस्थानच्या वाळवंटांपर्यंत पसरलेली ही कथा आता अधिक भव्य रूपात समोर येत असून, तिचे विशाल विश्व आणि मोठ्या प्रमाणातील कथनशैली देशभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचणार आहे.

कलाकारांची ही फळी आणखी भक्कम करत, चित्रपटात अभिषेक बॅनर्जी, रसिका दुगल, मोहित मलिक, शीबा चड्ढा, राजेश तैलंग, प्रमोद पाठक, श्रिया पिलगावकर, हर्षिता शेखर गौर, श्वेता त्रिपाठी आणि सोनल एस. चौहान यांच्या देखील महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. हे सर्व कलाकार मिर्झापूरच्या विश्वातील एका रोमांचक आणि अद्याप न उलगडलेल्या अध्यायाला जिवंत करण्यासाठी एकत्र आले आहेत.

‘मिर्झापूर: द मूव्ही’ हा चित्रपट अमेझॉन एमजीएम स्टुडिओज आणि एक्सेल एंटरटेनमेंट यांच्या प्रस्तुतीत तयार झाला आहे. गुरमीत सिंग यांनी दिग्दर्शित केलेला आणि पुनीत कृष्णा यांनी लिहिलेला हा चित्रपट, रितेश सिधवानी आणि फरहान अख्तर यांनी निर्मित केला असून, कासिम जगमागिया आणि विशाल रामचंद्रानी हे सहनिर्माते आहेत. हा चित्रपट ४ सप्टेंबर २०२६ रोजी भव्य स्वरूपात सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. हा ‘भौकाल’ अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचावा यासाठी ‘मिर्झापूर: द मूव्ही’ हिंदी आणि तेलुगू या भाषांमध्ये प्रदर्शित करण्यात येणार आहे.

# नाझिया इलाही यांच्यावर गुन्हा दाखल करून अटक करण्याची काँग्रेस अल्पसंख्याक विभागाची मागणी

छत्रपती संभाजीनगर, दि. २६ (प्रतिनिधी) – पश्चिम बंगाल येथील भाजप अल्पसंख्याक मोर्चाच्या पदाधिकारी नाझिया इलाही यांनी मुस्लिम समाज, महाराष्ट्र पोलीस तसेच पैगंबर मोहम्मद यांच्याविषयी वारंवार आक्षेपार्ह वक्तव्ये करून धार्मिक भावना दुखावल्या असून त्यामुळे दोन समाजांमध्ये तेढ निर्माण होण्याची शक्यता असल्याचा आरोप करत त्यांच्याविरुद्ध तातडीने गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावी, अशी मागणी अल्पसंख्याक शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली.

यासंदर्भातील निवेदन पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांना देण्यात आले.

या वेळी नाझिया इलाही यांच्या कथित वक्तव्यांमुळे सामाजिक सलोखा बिघडू शकतो, त्यामुळे



कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

या आंदोलनाचे नेतृत्व अल्पसंख्याक शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष अनिस पटेल, शहराध्यक्ष मोईन इनामदार तसेच शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. सय्यद अक्रम यांनी केले.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस डॉ. सरताज पठाण, इब्राहिम पठाण, ॲड. इकबालसिंग गिल, गुलाब पटेल, डॉ. अरुण शिरसाट, असदउल्ला, शकील, साजिद कुरेशी, नदीम सौदागर, शेख कैसर बाबा, इरफान पठाण, साहेबराव बनकर, डॉ. सिकंदर शेख, अब्दुल रज्जाक शेख, जसबीरसिंग, सौदी, शाहिद खान, मुदस्सीर अन्सारी, अजमल सिद्दीकी, सलीम पटेल, महेश वैद्य, शफीक शेख, सबिया बाजी, शेख आबेद पठाण, शहेबाज खान, अब्दुल रझिक शेख, सय्यद युनूस, सय्यद अशफाक अली, एजाज खान यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजन अल्पसंख्याक शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष अनिस पटेल आणि शहराध्यक्ष मोईन इनामदार यांनी केले होते.

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



छत्रपती संभाजीनगर, दि. २६ (प्रतिनिधी) – महानगरपालिकेच्या वतीने आज मिल कॉर्नर येथील छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळ्यास महापौर श्री. समीर राजुरकर, सभापती स्थायी समिती श्री.अनिल मकरिये व आयुक्त अमोल येडगे यांच्या शुभ हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी नगरसेविका कीर्ती शिंदे, उप आयुक्त नंदकिशोर भोंबे, मुख्य उद्यान अधिक्षक विजय पाटील, मुख्य अग्निशमन अधिकारी अशोक खांडेकर, सहायक आयुक्त लता पुजारी, रमेश मोरे, वॉर्ड अभियंता कुलकर्णी, माहिती व जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद, विभागाचे रविंद्र खरात, संतोष कोठाळे, करण साळवे आदींची उपस्थिती होती.

# दिव्यांग व्यक्तींसाठी बीज भांडवल योजना; लाभासाठी अर्ज दाखल करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. २६ (प्रतिनिधी) – जिल्हा परिषदेच्या सहायक आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयामार्फत सन २०२६-२७ या वर्षासाठी दिव्यांग व्यक्तींच्या स्वयंरोजगाराकरिता 'बीज भांडवल योजना' जाहीर करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र दिव्यांग व्यक्तींनी १० ऑगस्ट २०२६ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन सहायक आयुक्त श्री. बाबासाहेब अरवत यांनी केले आहे.

बँक नियमानुसार १.५ लक्ष रुपयांचे कर्ज मंजूर झाल्यावर, दिव्यांग सक्षमीकरण विभागामार्फत मंजूर कर्जाच्या २०% रक्कम सबसिडी (अनुदान) म्हणून दिली जाते.

यामध्ये अंध, कर्णबधीर आणि अस्थिव्यंग व्यक्ती पात्र (मतीमंद व्यक्ती अपात्र) अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षांच्या दरम्यान असावे. दिव्यांग प्रमाणपत्र (णऊखऊ) ४०% किंवा त्यापेक्षा जास्त असावे.

तहसीलदार यांचे मार्च २०२७ पर्यंत वैध उत्पन्नाचे प्रमाणपत्र व रहिवासी प्रमाणपत्र.बेरोजगार प्रमाणपत्र आणि व्यवसायासाठी 'ना हरकत' प्रमाणपत्र.

रेशन कार्ड, मतदान कार्ड,आधार कार्ड क्रमांक वगळला, आणि दिव्यांग णऊखऊ प्रमाणपत्र.दोन पासपोर्ट आकाराचे फोटो.व्यवसायाचे कोटेशन आणि प्रकल्प अहवाल.जागेबाबत भाडे पावती, करारनामा किंवा मालकी हक्काचा पुरावा. अशी कागदपत्रे सादर करावी लागणार आहे.

अर्जदारांनी योजनेच्या सर्व अटी व शर्ती वाचून आवश्यक कागदपत्रांसह आपला अर्ज सहायक आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर येथे सादर करावा. अर्ज स्वीकारण्याची मुदत २५ जून २०२६ ते १० ऑगस्ट २०२६ पर्यंत आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पात्र दिव्यांग व्यक्तींनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन बाबासाहेब अरवत सहाय्यक आयुक्त दिव्यांग सक्षमीकरण जिल्हा परिषद यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# ग्रंथालयांच्या न्याय्य मागण्यांसाठी २९ जूनला जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन

छत्रपती संभाजीनगर, दि. २६ (प्रतिनिधी) – राज्यात शासन मान्य ११९५५ सार्वजनिक ग्रंथालय आहेत. गेल्या पंधरा वर्षापासून यांचे प्रलंबित प्रश्न सुटलेले नाहीत म्हणून राज्य शासनाने सार्वजनिक ग्रंथालयांसाठी जाहीर केलेल्या ४० टक्के अनुदानवाढ, ग्रंथालयांचे वर्गबदल आणि २००० नवीन सार्वजनिक वाचनालयांना मान्यता या वेळोवेळी अधिवेशनात केलेल्या घोषणांची तातडीने अंमलबजावणी व्हावी, तसेच ग्रंथालय क्षेत्रातील प्रलंबित प्रश्न मार्गी लागावेत, या म ागण्यांसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने सोमवार, दि. २९ जून, २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या आंदोलनात जिल्ह्यातील ग्रंथालयांचे पदाधिकारी, कर्मचारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

आंदोलनासाठी सिटी चौक पोलीस ठाण्याकडे आवश्यक परवानगी मागण्यात आली असून, विधानसभेच्या अधिवेशनादरम्यान शासनाचे लक्ष ग्रंथालयांच्या प्रश्नांकडे वेधण्यासाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

ग्रंथालय संघाचे अध्यक्ष सुभाष सोळंके आणि सचिव गुलाबराव मगर यांनी सांगितले की, शासनाने अनेक बैठकींमध्ये ४० टक्के अनुदानवाढ, ग्रंथालयांचे वर्गबदल आणि २००० नवीन सार्वजनिक वाचनालयांना मान्यता देण्याची घोषणा केली होती. मात्र, त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्याप झालेली नसल्याने शासनाला दिलेल्या आश्वासनांची आठवण करून देण्यासाठी लोकशाही मार्गाने हे धरणे आंदोलन करण्यात येत आहे.

याशिवाय सन २०१२ पासून प्रलंबित असलेले ग्रंथालयांचे वर्गबदल, कार्यरत ग्रंथालयांच्या अनुदानात नैसर्गिकन्यायप्रमाने आणि सामाजिक दृष्टिकोनातून अनुशेषाप्रमाणे तिप्पट वाढ तसेच ग्रंथालय कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करणे या प्रमुख मागण्याही शासनाने तातडीने मंजूर कराव्यात, अशी संघाची मागणी आहे.

संघाने स्पष्ट केले की, या आंदोलनामागे कोणताही श्रेयवाद किंवा मोठेपणाचा हेतू नसून, ‘ग्रंथालय वाचवा – ज्ञान वाचवा’ या उद्देशाने सार्वजनिक ग्रंथालयांचे अस्तित्व टिकविणे आणि ज्ञानसेवा अधिक सक्षम करणे हाच एकमेव हेतू आहे.

धरणे आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष सुभाष सोळंके, सचिव गुलाबराव मगर, साईनाथ जाधव, राजेंद्र वाणी, तुषार सराफ, विष्णू बोडके, अनिल पाटील (चिकटगावकर), डी.बी. देशपांडे, डॉ. दत्तात्रय साळुंखे, सुषमा जोशी, अरविंद लंकेपाटील, भास्कर लहाने, गुलाम मोहम्मद, बी. डी. साळुंके, अशोक उजळमकर, बाबासाहेब वाहूळ, डी डी जाधव, देशमाने, ज्ञानेश्वर सूर्यवंशी, के डी गाडेकर, क्षीरसागर, मारुती फुलारी, पंडित नवले, भाऊसाहेब पठाडे, प्रणिता कुलकर्णी, विटोरे, बद्रीनाथ कदम, विठ्ठल गोरे ,अंकुश पाटील, कैलास गायकवाड विठ्ठल कदम तसेच संघाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी केले आहे.

## बॉलिवूड स्टार जॉन अब्राहमची क्रिकेटमध्ये एन्ट्री!

**मुंबई–** बॉलिवूड आणि स्पॉर्ट्स या दोन्ही क्षेत्रातील एकमेकांसोबतचं नातं तसं फार जुनं. बॉलिवूडमधील अनेक सिनेकलाकारांची आयपीएलम ध्ये टीम्स आहेत. शाहरुख खानची कोलकाता नाइट राइडर्स असो किंवा प्रीति झिंटाची पंजाब किंग्स. आयपीएलमध्ये अनेक कलाकारांच्या टीम्स आहेत. जॉन अब्राहम (गेहप अलीरहरा) हा रॉटरडॅम डॉकर्सचा को- ओनर बनला आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# अश्लील व्हिडिओ बनवून पुरुषांची लुटमार; महिला टोळीप्रमुखासह सहा जणांना अटक

जालना दि.२६ (प्रतिनिधी)- सोशल मीडियावरुन किंवा वेगवेगळ्या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरुन तरुणाईला किंवा पुरुषांना अश्लील व्हिडिओच्या माध्यमांतून जाळ्यात फसवण्याचा नवा फंडा सध्या जोरात पाहायला मिळतो. याप्रकरणी, अनेकदा सायबर पोलिसांनी कारवाई देखील केली असून सातत्याने असे प्रकार पुढे येत आहेत. याप्रकरणी जालना पोलिसांनी मोठी कारवाई करत सोशल मीडिया आणि फोनवरून ओळख करून अश्लील व्हिडिओ बनवत लुटमार करणाऱ्या एका महिला टोळीप्रमुखासह सहा जणांना अटक केली आहे.

जालन्यातील नवा मोंढा परिसरात एका तरुणाशी ओळख वाढवून त्याला एकांत ठिकाणी बोलावत आरोपी तरुणीने साथीदारांसह युवकाला मारहाण केली होती. तसेच, तीन दिवसांपूर्वी घडलेल्या या घटनेत तरुणाकडून ८० हजार रुपये देखील काढून घेण्यात आले होते. याप्रकरणी चंदनझिरा पोलिसांनी गुन्हा दाखल करत संपूर्ण टोळीला आज जेरबंद केलं. पकडण्यात आलेल्या टोळीप्रमुख आरोपी तरुणीवर छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यात अश्लील व्हिडिओ बनवून लुटमारीचे तब्बल सहा गुन्हे दाखल आहेत. विशेष म्हणजे, काही महिन्यांपूर्वी याच तरुणीच्या त्रासाला कंटाळून छत्रपती संभाजीनगरमधील करमाड येथे एका तरुणाने आत्महत्या केली होती.

पोलिसांनी या टोळीकडून रोख रक्कम, मोबाईल आणि रिक्षासह एकूण २ लाख ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी आरोपी तरुणीकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिस सूत्रांकडून वर्तवली जात आहे. त्याच अनुषंगाने पोलिसांकडून तपास सुरू आहे, अशी माहिती जालन्याचे डीवायएसपी अनंत कुलकर्णी यांनी दिली.

# औषधी भवन लगतच्या नाल्याची महापौर, स्थायी समिती सभापती व आयुक्तांकडून संयुक्त पाहणी



छत्रपती संभाजीनगर दि.२६ (प्रतिनिधी)- शहरातील औषधी भवन लगतच्या नाल्याच्या समस्येची गंभीर दखल घेत आज महापौर समीर राजूरकर, स्थायी समिती सभापती अनिल मकरीये आणि मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी संबंधित ठिकाणी संयुक्त पाहणी केली.

स्थायी समिती सभापती अनिल मकरीये यांनी या समस्येकडे लक्ष वेधल्यानंतर ही संयुक्त पाहणी करण्यात आली. पाहणीदरम्यान औषधी भवन इमारतीची उंची कमी असल्यामुळे नाल्याच्या साफसफाईच्या कामात मोठ्या अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले. नाल्यात जेसीबी यंत्र उतरविण्यास पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने नियमित साफसफाई करणे कठीण होत असल्याचे यावेळी स्पष्ट झाले.

याशिवाय, या नाल्यात सुमारे २५० घरांचे सांडपाणी (ड्रेनेज) सोडण्यात येत असल्यामुळे नुकत्याच झालेल्या पावसात नाल्याचे पाणी अनेक घरांमध्ये शिरून नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागल्याची माहिती यावेळी देण्यात आली. यावर संबंधित घरांचे ड्रेनेज मुख्य ड्रेनेज लाइनला जोडण्याचे सूचना करण्यात आली.

पाहणीदरम्यान महापौर, स्थायी समिती सभापती आणि आयुक्त यांनी औषधी भवन परिसरात नाल्यात प्लास्टिक व थर्माकोल जाण्यापासून प्रतिबंध करण्यासाठी बॅरियर उभारण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

तसेच, औषधी भवन इमारतीची लीज मुदत संपलेली आहे अथवा नाही, याची तातडीने तपासणी करून त्यानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी यावेळी दिले. तसेच या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी संबंधित विभागांनी तातडीने कार्यवाही करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# आयआयटी प्रवेश परीक्षेत वैजापूरची युविका संतोष राजपूत देशात १५वी

वैजापूर दि.२६ (प्रतिनिधी)- येथील रहिवासी संतोष धोंडीरामसिंह राजपूत यांची कन्या युविका संतोष राजपूत यांनी आय. आय.टी. प्रवेश परीक्षेत खुल्या प्रवर्गातून देशात १५व्या क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान पटकावला त्यांचा प्रवेश आसाम राज्यातील गोहाट्टी येथील शासकीय आय आय टी महाविद्यालयात झाला व इयत्ता १२ वी विज्ञान शाखेत युविकाने८२टक्के गुण प्राप्त केले, त्या प्रित्यर्थ छत्रपती संभाजीनगर येथील महाराष्ट्र राज्य राजपूत परदेशी विकास महासंघ यांच्या वतीने शुक्रवार (ता.२६) रोजी संत एकनाथ रंग मंदिर येथे झालेल्या गुणवंत विद्यार्थी




सोहळ्यात चिखलीच्या आ. श्वेताताई महाले व संभाजीनगर चे आ.प्रदीपजी जैस्वाल यांच्या हस्ते स्मृती चिन्ह,सन्मान पत्र देऊन करण्यात आला.

या प्रसंगी जिल्ह्यातील गुणवंत,समाज कार्यकर्ते, कर्मचारी ,लोकप्रतिनिधी यांचाही गौरव करण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रम अध्यक्ष तोताराम बहुरे होते. संघ राज्य अध्यक्ष विश्वनाथ नंदलाल राजपूत यांनी प्रास्ताविक सादर केले.

आ.श्वेताताई महाले, आ. प्रदीप जैस्वाल, संभाजीनगरचे एसीपी अशोकसिंह राजपूत, वैजापूर मुख्याधिकारी भागवत बिघोत, सेवा निवृत्त शिक्षणाधीकारी धोंडीरामसिंह राजपूत यांची समयोचित भाषणे झाली. या प्रसंगी चत्तरसिंग महेर, अॅड नरेंदसिंग शेवंगण, डॉ. गीताताई शेवंगण, भीमसिंग कहाटे, जिल्हाध्यक्ष फुलसिंह राजपूत, राजेंद्रसिंह राजपूत, कल्पनाताई राजपूत, रेखाताई काकरवाल, चंदा राजपूत, प्राचार्य गुरुदत्त राजपूत यांच्या सह जिल्ह्यातील राजपूत-परदेशी समाजाचे विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. युविका संतोष राजपूत या वैजापूरचे सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांची नात आहे.

# नांदेड पोलिसांनी दिले १९ जनावरांना जीवदान!



नांदेड दि.२६ (प्रतिनिधी)- कत्तल करण्यासाठी वाहनांमधून नेण्यात येणाऱ्या १० तसेच देगलूर नाका भागात बांधून ठेवलेल्या ९ अशा १९ गोवंशांना नांदेडच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शुक्रवार (दि.२६) रोजी जीवदान दिले. या प्रकरणी चार आरोपींविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड जिल्ह्यात अवैध मार्गाने गोवंश जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती नव्याने रुजू झालेले पोलीस अधीक्षक डॉ.नीलभ रोहन यांना मिळाली. त्यांनी या घटनेची तात्काळ दखल घेत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांना या बाबीची माहिती दिली. त्यांनी लगेच आपल्या सहकाऱ्यांना देगलूर नाका भागात पाठवले.

या दरम्यान आलु-कांदा मार्केट भागातील मलशुद्धीकरण केंद्रासमोरील एकबाल नगर पाण्याच्या टाकीजवळ आरोपी मो.सादीक अब्दुल गफुर याच्या शेडमध्ये गोवंश जातीची जनावरे कत्तलीसाठी येणार असल्याचे समजल्यानंतर पोलिसांनी शुक्रवारी सकाळी ८.३० वाजेच्या सुमारास वाहन क्र.एम.एच.२६.बीइ.४९४६ची तपासणी केली असता १० बैल आढळून आले. तसेच याच ठिकाणी ०८ बैल व एक गाय शेडमध्ये बांधल्याचे दिसून आले. पोलिसांनी १९ जनावरांना जीवदान दिले. या प्रकरणी आरोपी झबीउल्ला खान (वय ३०), शे.कलीम (वय ३५), मो. सादीक (वय ४८), मो.रिझवान (वय ४०) या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी पकडलेल्या जनावरांसह टेम्पोची किंमत २२ लाख ६० हजार रूपये असल्याचे सांगितले. या प्रकरणाचा अधिक तपास नांदेड ग्रामीण पोलीस करत आहेत.

# मध्य-प्रदेशातील अपघातात संभाजीनगरचे चार व्यावसायिक ठार; दोघे गंभीर जखमी

छत्रपती संभाजीनगर दि.२६ (प्रतिनिधी)- मध्य प्रदेशातील मंदसौर येथे झालेल्या भीषण अपघातात छत्रपती संभाजीनगरमधील चार व्यावसायिक गुरुवारी ठार झाले. तर दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर मंदसौर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती निकटवर्तीयांकडून मिळाली.

मृत व जखमी असे सर्वजण कारने जळगाव मार्गे दिल्लीला मोबाइल उपकरणांचे साहित्य आणण्यासाठी जात होते. दिल्ली-मुंबई एक्स्प्रेस-वेवरील सीतामऊ परिसरातील तितरोदजवळ त्यांच्या कारचा व ट्रक ट्रेलरलचा धडकून अपघात घडला. अपघातानंतर गोल्डन आवरमध्ये म्हणजे दुर्घटनेच्या तासाभरात मदतकार्य पोहोचू शकले नाही. त्यानंतर मात्र नजीकच्या ग्रामस्थांनी आणि इतर वाहन चालकांनी १ तास बचावकार्य राबवून जखमी व मृतांना बाहेर काढले. त्यानंतर एका वाहनातून अपघातग्रस्तांना रुग्णालयात पोहोचवण्यात आले. अपघातानंतर ट्रेलर चालक वाहनासह पसार झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

राजेंद्र कवडे यांनी येथील कॅनॉट प्लेस भागात मोबाईल फोनच्या साहित्याचे दुकान सुरू केले होते. याच दुकानासाठी मोबाइल दुरुस्तीसाठी आधुनिक मशीन आणण्यासाठी राजेंद्र कवडे हे रवींद्र काळेच्या कारने दिल्लीला निघाले होते. परंतु वाटेतच त्यांच्यासह चौघांवर काळाने झडप घातली.

या अपघातात राजेंद्र भाऊराव कवडे (वय ४६) यांच्यासह सचिन गंगाधर गजभारे (३९), संदीप नवनाथ बोरसे (३४), रवींद्र भागवत काळे (२८) यांचा मृत्यू झाला. तर अब्दुल खलील (३०), उमर इस्माईल जागीरदार (३२, रा. गंगापूर, जि. संभाजीनगर) हे दोघे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर मैंदसैर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती आहे. या दोघांसह मृताचे नातेवाईक रात्री मैंदसैर येथे दाखल झाले होते. रात्री चारही मृतदेह घेऊन नातेवाईक छत्रपती संभाजीनगरकडे निघाले.

राजेंद्र कवडे व संदीप बोरसे हे दोघेही या अपघातात मृत्यू पावले. दोघेही नात्याने मावसभाऊ. या दोघासह रवींद्र काळे व सचिन गजभारे यांचाही अपघातात मृत्यू झाला. कवडे यांच्या कुटुंबात राजेंद्र हेच कर्ते पुरुष होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा व वहिनी आहेत. तर संदीप बोरसे यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, आई-वडील व भाऊ असा परिवार आहे. रवींद्र काळे हे कुटुंबातील एकुलते एक. त्यांच्या पश्चात दुसऱ्या गरोदर असलेली पत्नी व साडे तीन वर्षाचा मुलगा आहे.

# नियमबाह्य रस्ता खोदकामाची स्थायी समिती सभापतींकडून गंभीर दखल; चौकशी करून दोषींवर कडक कारवाईचे निर्देश



छत्रपती संभाजीनगर दि.२६ (प्रतिनिधी)- धनमंडी बाग (जुना बाजार) व नारळी बाग परिसरात दोन वर्षापूर्वीच बांधण्यात आलेला सिमेंट-कॉंक्रीट रस्ता नियमबाह्य पद्धतीने फोडून नवीन ड्रेनेज लाईन टाकण्यात येत असल्याबाबत स्थानिक रहिवाशांनी दि. २५ जून रोजी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत निवेदन देऊन तक्रार केली होती. या तक्रारीची स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी तातडीने दखल घेत संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन संपूर्ण परिस्थितीची पाहणी केली.

पाहणीदरम्यान सार्वजनिक रस्त्याची झालेली तोडफोड तसेच उघड्या अवस्थेतील ड्रेनेजमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे निदर्शनास आले. तसेच अशा प्रकारच्या कामामुळे सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होत असल्याची बाबही अत्यंत गंभीर असल्याचे सभापती मकरिये यांनी नमूद केले.

याप्रकरणी कोणत्याही प्रकारची अनधिकृत कामे किंवा सार्वजनिक रस्त्यांची नियमबाह्य तोडफोड अजिबात खपवून घेतली जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका सभापती मकरिये यांनी व्यक्त केली. या प्रकरणाची सखोल चौकशी करून नियमबाह्य काम करणारे संबंधित तसेच संबंधित ठेकेदार यांच्यावर नियमानुसार कठोर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

याशिवाय, परिसरातील नाल्यांची तातडीने व नियमित साफसफाई करून पावसाळ्यात नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सूचनाही सभापती अनिल मकरिये यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच भविष्यात अशा प्रकारच्या नियमबाह्य घटना पुन्हा घडू नयेत यासाठी आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

# शहरातील पाणीपुरवठा, शाळा, गुंठेवारी व हेरिटेज प्रश्नांवर कॉंग्रेस आक्रमक; आयुक्तांना निवेदन

छत्रपती संभाजीनगर दि.२६ (प्रतिनिधी)- शहरातील पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, गुंठेवारी नियमितीकरण, हेरिटेज समितीची प्रलंबित कामे तसेच मराठी व उर्दू माध्यमाच्या शाळांवरील विविध कर व शुल्कांच्या प्रश्नांबाबत छत्रपती संभाजीनगर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीने महानगरपालिका प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे.

या विविध मागण्यांसंदर्भात माजी शहराध्यक्ष इब्राहिम पठाण व शहराध्यक्ष अॅड. सय्यद अक्रम सय्यद अब्बास यांच्या नेतृत्वाखाली महानगरपालिका आयुक्तांना सविस्तर निवेदन देण्यात आले. निवेदनात महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त मराठी व उर्दू माध्यमाच्या शाळांना मालमत्ता करातून सूट देण्याची मागणी करण्यात आली.

गोरगरीब व अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांचे शिक्षण या शाळांमधून होत असल्याने त्यांना विविध कर व शुल्कांमधून दिलासा देणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले. शाळा व रुग्णालयांच्या इमारतींना फायर ब्रिगेड एनओसीसाठी समान शुल्क आकारले जात असल्याचा मुद्दा कॉंग्रेसने उपस्थित केला. शैक्षणिक संस्था समाजहितासाठी कार्यरत असल्याने शाळांना विशेष सवलत देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. विशेषतः चॅरिटेबल स्वरूपाच्या व गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या शाळांना फायर ब्रिगेड एनओसी शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे. तसेच संबंधित विभागांनी ना हरकत प्रमाणपत्रे जलद गतीने जारी करावीत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली. गुंठेवारी नियमितीकरणाच्या प्रकरणांमध्ये नागरिकांना मोठा विलंब सहन करावा लागत असल्याने संचिकांची ऑनलाइन छाननी करून तातडीने मंजुरी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच अनेक महिन्यांपासून हेरिटेज समितीची बैठक न झाल्यामुळे बांधकाम परवानग्या व इतर महत्त्वाची प्रकरणे प्रलंबित असल्याचे कॉंग्रेसने निदर्शनास आणून दिले.

(पान १ वरुन)

## केतन अग्रवाल हत्या प्रकरणासाठी...

जाणार नाही आणि या प्रकरणातील दोषींना अत्यंत कठोर शिक्षा व्हावी यासाठी आम्ही पूर्णपणे कटिबद्ध आहोत, असे भक्कम आश्वासन दिले.

अग्रवाल कुटुंबीयांनी या खटल्यासाठी जलदगती न्यायालयाची स्थापना आणि विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्याची केलेली मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ मान्य केली आहे. त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी विधी व न्याय विभागाच्या सचिवांना तातडीने आवश्यक ते निर्देश दिले असून, स्वतः अॅड. उज्ज्वल निकम यांनीही या न्यायदानाच्या प्रक्रियेत विशेष सरकारी वकील म्हणून काम पाहण्यास आपली संमती दर्शवली आहे.

अटकेनंतर सियाचा प्रियकर चेतनने रडत रडत स्वतःचे वडील बाबूलाल चौधरी यांना सांगितले की, घटना घडली तेव्हा सिया केतनजवळ उभी होती, मी तर दूर उभा होतो. पोलिसांच्या तपासात असे निष्पन्न झाले की, जानेवारी ते जून २०२६ या सहा महिन्यात सिया व चेतनमध्ये २००४ कॉल झाले होते.

## धुळे जिल्ह्यात २ कोटींहून..

तथा राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षक श्रीमती स्वाती काकडे, पोलीस उपअधीक्षक अजय देवरे, प्रभारी उपअधीक्षक (गृह) अभिजित सोनवणे, तहसीलदार अतुल शेवाळे आणि सहायक रासायनिक विश्लेषक अतुल पाटील यांनी कागदपत्रांची पडताळणी करून प्रक्रिया पूर्ण केली. पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांच्या उपस्थितीत शासकीय पंच हर्षल जोशी व महेंद्र कापडे यांनी पंचनामा केला.

## लोकसभेसाठी पूर्ण कंबर...

नवनीत राणा राज्यसभेसाठी राष्ट्रवादीच्या दारात गेली, पण नवनीत राणा कोणाच्या दारात गेली नाही, मी २०२४ मध्ये तिकिटासाठी पण कोणाच्या दारात गेली नाही. नवनीत राणा इतकी कमजोर नाही की, मी राज्यसभेसाठी दारावर जाईल. मी माझी विचारधारा सोडून कोठेही जाणार नाही. पद येतील, पद जातील पण माझे विचार शेवटच्या श्वासापर्यंत लढेल. मी लोकसभेसाठी पूर्ण कंबर कसली आहे, मी मैदानात उभी आहे. मी खासदार होती तेव्हा मी संसदेमध्ये अनेक विद्यार्थ्यांना नेत होती. पण, मी आता नेऊ शकत नाही, याचं दुःख आहे. अमरावती-नागपूर लवकर मेट्रो सुरू होईल. येणारं भविष्य आपलं आहे, कोणाला भविष्यासोबत खेळू देणार नाही,' असे त्यांनी म्हटले आहे.

## आंदोलन दडपण्याचा प्रयत्न...

रोख स्वरूपात दिल्याचा गंभीर आरोप रोहित पवार यांनी केला आहे. या पैशातून केवळ लोकप्रतिनिधींच्या कुटुंबाचा आणि नातेवाईकांचा फायदा झाला असून सर्वसामान्यांच्या पदरी निराशाच पडली आहे असे ते म्हणाले. आमदार रोहित पवार यांनी आज परभणीत राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेतला. त्यानंतर, पत्रकार परिषदेत त्यांनी राज्य आणि देशातील अनेक राजकीय आणि सामाजिक मुद्द्यांवर भाष्य करत भाजप आणि सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका केली. राज्यात राजकीय पक्षातील फोडाफोडीवरही त्यांनी भाष्य केलं, तर आमचे खासदार कुठेही जाणार नसल्याचं त्यांनी म्हटलं. ते आमच्या खासदारांच्या संपर्कात असू शकतात, पण आमचे खासदार फुटणार नाहीत'', असा विश्वास रोहित पवार यांनी व्यक्त केला.

Truhome FINANCE

**ट्रूहोम फायनान्स लिमिटेड** (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१;
**दूरध्वनीः** १८०० १०२ ४३४५, **वेबसाइटः** http://www.truhomefinance.in
**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;

**परिशिष्ट-४-ए** [नियम ८(६) ची तरतूद पहा] **स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

**सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल अॅसेट्स अॅण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट अॅक्ट, २००२ सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ च्या नियम ८ (६) तरतुदीअनव्ये स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई - लिलाव विक्री सूचना.**

सर्व सामान्य जनतेस व विशेषतः कर्जदार, तारणकर्ता / कर्ते आणि जामीनदाराना येथे सूचना देण्यात येत आहे कि, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)कडे तारण /अधिभारीत असलेल्या खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)** सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतलेला आहे आणि खाली तक्त्यात दिलेल्या तपशिलानुसार लिलावाच्या आधारावर **'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'जसे जेथे आहे ' या तत्वावर दि २८-०७-२०२६ रोजी स.११:०० ते दु १२:००** या वेळेत विक्री केली जाईल. कर्जदार/जामीनदार / तारणकर्ता , देय रक्कम , स्थावर मालमत्तेचे लघु वर्णन राखीव किंमत आणि बयाणा रक्कम ठेव आणि तपासणीची तारीख देखील खालीलप्रमाणे दिली आहे: :

| कर्जदार/सहकर्जदार/ जमानतदार/ तारण ठेवण्याऱ्यांचे नाव | मागणी सूचनेची आणि वसुलीची रक्कम तारीख | राखीव किंमत (रु. ) आणि वाढीव बोली | लिलावाची तारीख व वेळ | संपर्क व्यक्ती तपशील – (एओ व निवारण समूह ) |
|---|---|---|---|---|
| **श्रीमती सुनीता जनार्धन निर्मळ (कर्जदार)** **श्री. सूरज फुलचंद उमाप (सह-कर्जदार)** **श्री. शुभम फुलचंद उमाप (सह-कर्जदार)** **सध्याचा पत्ता :प्लॉट क्र. ११B, छत्रपती नगर, मल्हार चौक, गारखेडा, औरंगाबाद, महाराष्ट्र – ४३१००९.** **कर्ज खाते क्र. : SBTHAURD0000928 / STUHAURD0000932.** **ताबा दिनांक व ताबा प्रकार** **०१-०५-२०२६. सांकेतिक ताबा.** **ज्ञात अधिभार** ज्ञात नाही | मागणी नोटीस तारीख :- १७-०१-२०२६ कर्ज खाते क्र. अनुक्रमे SBTHAURD0000928 आणि STUHAURD0000932. अंतर्गत दिनांक १२-०१-२०२६ रोजी रु. ६२,६५,७१७/- (फक्त बासष्ट लाख पासष्ट हजार सातशे सतरा रुपये) आणि रु. २६,९८,२०५/- (फक्त सव्वीस लाख अठ्ठ्याण्णव हजार दोनशे पाच रुपये). सदर नोटीस प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत करारातील दराने लागू होणाऱ्या पुढील व्याजासह. | रु. १,५३,४८,६००/- (फक्त एक कोटी त्रेपन्न लाख अठ्ठेचाळीस हजार सहाशे रुपये). **बोली वाढविणे :** रु. १०,०००/- आणि त्यापटीने **बयाणा ठेव रक्कम (ईएमडी ) (रुपयात )** रु. १५,३४,८६०/- (फक्त पंधरा लाख चौतीस हजार आठशे साठ रुपये). **ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख : २७ जुलै, २०२६. वेळ सकाळी १० ते सायं ५.००** | **२८-जुलै-२०२६. वेळ. सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत.** | **देबज्योती रॉय – ९८७४७०२०२१ सतीश बनसोड – ९७३००४७५७२ मयुरेश जाधव – ९८३३०१७२२१ अजय झांझोट – ९८२३३९०९९०** **मालमत्ता पाहणी दिनांक : २७-०७-२०२६ वेळ : दुपारी १२:०० ते ३:००.** |

**संपत्तीचे विवरण**

सर्व हक्क व हितसंबंधांसह असलेली सर्व्हे क्र. १९/२ मधील प्लॉट क्र. ११-B, क्षेत्रफळ १४३.१२ चौ. मीटर, छत्रपती नगर, गारखेडा, ता. व जि. औरंगाबाद – ४३१००९ येथे स्थित असलेली मालमत्ता .चतु:सीमा :पूर्वेस : प्लॉट क्र. १२पश्चिमेस : प्लॉट क्र. ११-Aदक्षिणेस : ५० फूट रुंद रस्ताउत्तरेस : प्लॉट क्र.

**०१. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाउसिंग फायनान्स लिमिटेड) च्या वेबसाइटला देखील भेट देऊ शकता.**
**०२. इच्छुक बोलीदारांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस / एनईएफटी स्वरूपात बँकेचे नाव- अॅक्सिस बँक लिमिटेड शाखा: वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई बँक खाते क्रमांक-चालू खाते क्रमांक ९११०२००४५६७७६३३ आयएफएससी कोड- यूटीआयबी ०००२३० येथे जमा करावी:**

ठिकाण - औरंगाबाद
दिनांक - २७-०६-२०२६

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )